https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

रविवार, ८ मार्च २०२६

# जागतिक महिला दिन विशेष



# घे भरारी



## तिच्या कर्तृत्वाचा रंग





**तिच्या कर्तृत्वाचा रंग हा एखाद्या इंद्रधनुष्याप्रमाणे अनेक छटांनी नटलेला असतो. घराच्या उंबरठ्यापासून ते आकाशाच्या उंच भरारीपर्यंत तिची कर्तृत्वाची छाप दिसून येते. कधी ती आई बनून संस्कारांची शिदोरी देते, कधी शेतात राबून अन्नदाता बनते, तर कधी शिक्षण, विज्ञान, कला आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांत यशाची पताका फडकवते. तिच्या कष्टांचा रंग मातीस-रखा साधा असला तरी त्यातून उमलणारे यश सोन्यासारखे तेजस्वी असते. म्हणूनच तिच्या कर्तृत्वाचा रंग हा केवळ एका दिवसाचा नसून, तो संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा उज्ज्वल रंग आहे. जागतिक महिला दिन आणि रंगपंचमी साजरी करताना विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने यशाची रंगपंचमी साजरी करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा 'तरुण भारत'ने घेतलेला वेध...**

## कर्तृत्वाच्या पंखांवर झेपावणारी नारीशक्ती



आजच्या बदलत्या काळात महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शिक्षण, उद्योग, सामाजिक, आरोग्य, कला, प्रशासन अशा अनेक क्षेत्रांत सोलापूरमधील महिला यशस्वी वाटचाल करत आहेत. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक अडचणींवर मात करत उंच भरारी घेतली आहे. महिलादिनाच्या निमित्ताने सोला-पूरसह जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांशी दैनिक तरुण भारतने मुलाखत घेतली असता आपल्या कामाचा प्रवास, आलेले अनुभव, संघर्ष आणि यशाची कहाणी त्यांनी अगदी मनमोकळेपणाने सांगितले. काही महिलांनी व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन मिळवले, तर काहींनी सामाजिक कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे काम केले आहे. या महिलांनी आपल्या कर्तृत्वातून केवळ स्वतःची ओळख निर्माण केली नाही, तर इतर म हलांसाठीही प्रेरणादायी उदाहरण उभे केले आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, म ेहनत करा आणि संधी मिळाली की ती धैर्याने स्वीकारा, असा संदेशही त्यांनी दिला. महिला दिन हा केवळ साजरा करण्याचा दिवस नसून महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्याचा दिवस आहे. सोलापूरमधील या कर्तृत्ववान महिलांच्या अनुभवातून नव्या पिढीतील मुलींना प्रेरणा मिळत असून समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा अधोरेखित होत आहे.

## महिलांनी मोठी स्वप्ने पाहावीत


सुवर्णा पेठे
संचालिका, पेठे फूड्स



जागतिक महिला दिनाच्या सर्व महिलांना शुभेच्छा. उद्योजकतेत संयम, सातत्य आणि नवकल्पनांची जोड अत्यंत महत्त्वाची असते. पेठे फूड्स उभारताना अनेक अडचणी आल्या. मात्र गुणवत्तेवर तडजोड केली नाही. महिलांनी ही भीती न बाळगता पुढाकार घ्यावा, अपयशातून शिकत रहावे आणि मोठी स्वप्ने पाहावीत. प्रामाणिक प्रयत्नांना यश नक्की साथ देते. बाजारपेठेतील स्पर्धा, आर्थिक अडचणी आणि बदलत्या ग्राहक अपेक्षा या सर्वांचा अभ्यास करूनच पुढे जावे लागते. आत्मविश्वास, चिकाटी आणि संघभावना यांच्या जोरावर कोणतीही महिला स्वतःचा ठसा उमटवू शकते. स्थानिक पातळीवर यश मिळवल्यानंतर आता राष्ट्रीय स्तरावर ब्रँड पोहोचविण्याचे आमचे ध्येय आहे. उद्योजकतेचा प्रवास हा केवळ नफ्यापुरता मर्यादित नसून समाजाशी नाळ जोडणारा असतो. स्थानिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या कौशल्यविकासाला प्रोत्साहन देणे आणि स्वावलंबनाची भावना रुजवणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्राहकांचा विश्वास हेच आमचे खरे भांडवल आहे.

गुणवत्ता, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांवर भर देत आम्ही पुढील पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत. महिलांनी आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवून उद्योग-क्षेत्रात धाडसाने पाऊल टाकावे, असेही त्यांनी नमूद केले. उद्योग-व्यवसाय करताना अडचणी आणि संकटे येणे, हा त्या काम ाचा अविभाज्य भाग असतो. व्यवसायात कोणतीही लाज न बाळगता कष्ट करायची तयारी ठेवावी लागते. व्यवसायात अनेक चढ-उतार येत असतात. यामध्ये यशस्वी होण्यासाठी सहनशक्ती असावी लागते. व्यवसायात अनेक संकटे येत असतात त्यावर मात करायला शिका. यश निश्चित मिळते. नवनवीन इच्छाशक्तीच्या संकल्पनेच्या जोरावर यशस्वी उद्योजिका होता येते, असा सल्ला पेठे फूड्सच्या संचालिका सुवर्णा पेठे यांनी दिला. सोलापूरवासीयांच्या दृष्टिकोनातून तर पेठे फूड्स उत्तम दर्जाचा बॅण्डच ठरलेलाच आहे. आता या ब्रँडला संपूर्ण देशात पोहचविण्याचे माझे ध्येय असल्याचे सुवर्णा पेठे यांनी महिला दिनानिमित्त सांगितले.

## सावित्रीबाईंच्या आदर्शातून सक्षमीकरणाचा नवा मार्ग


सायली जोशी
सचिव, साई महिला प्रतिष्ठान

शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व महिलांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची ज्योत प्रज्वलित ठेवली आणि स्त्रीशिक्षणाचा पाया रचला. आज ग्रामीण तसेच शहरी भागातील महिला देशातील मोठ्या पदांवर कार्यरत असून विविध क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. ही बदलाची सकारात्मक चिन्हे आहेत.

महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून सक्षम व्हावे, आर्थिक स्वावलंबनासोबतच स्वसंरक्षणाचेही धडे घ्यावेत. महिलांमध्ये अपार सामर्थ्य आहे. त्या घरची जबाबदारी सांभाळून बाहेरील जबाबदाऱ्या देखील सम र्थपणे पार पाडतात. आत्मविश्वास, शिक्षण आणि जिद्द यांच्या जोरावर प्रत्येक महिला समाजपरिवर्तनाची शक्ती बनू शकते. सावित्रीबाईंच्या कार्यातून प्रेरणा घेत महिलांनी नव्या पिढीसाठी मार्गदर्शक बनावे.



# स्त्री शून्यातून विश्व निर्माण करते


विद्या बाबर
कोष्टी गल्ली, सांगोला

आई ही कुटुंबाचा आधारस्तंभ असते. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ती दिवस-रात्र मेहनत करते. स्वतःच्या थकव्याची पर्वा न करता ती त्यांच्या शिक्षणासाठी, संस्कारांसाठी आणि स्वप्नांसाठी झटत राहते. तिच्या प्रेमात ताकद असते आणि त्याच ताकदीमुळे मुलांना आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. विद्या बाबर या गेली वीस वर्षे कांबळे कलेक्शन, सांगोला येथे काम करत आहेत. त्यांच्या त्यागामुळे आणि कष्टामुळेच त्यांची दोन्ही मुले यशाच्या शिखरावर पोहोचली आहेत. त्यांची दोन्ही मुले इंजिनिअर असून एक मुलगा सहकार आयुक्तालय, पुणे येथे कार्यरत आहे तर दुसरा मुलगा स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. त्यांनी घेतलेली मेहनत आणि मुलांना दिलेली साथ हेच त्यांच्या यशाचे खरे गुपित आहे. हेडींग सांगणे

# प्रत्येक मुलींमध्ये स्वप्न पूर्ण करण्याची ताकद


रेखा तिपरादी
वळसंग

रेखा शिवलिंगप्पा तिपरादी, वळसंग येथील रहिवासी असून सध्या सोलापूर येथे यूको बँकेत सहाय्यक व्यवस्थापक म्हणून २०१८ पासून कार्यरत आहे. साध्या मध्यमवर्गीय कुटुंबातून येत असताना बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या तयारीत अनेक अपयश आले, परंतु मी कधीही हार मानली नाही. सातत्याने अभ्यास, कठोर परिश्रम आणि कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे शेवटी मला यश मिळाले. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार माझे भाऊ आहेत. त्यांनी नेहमी माझ्यावर विश्वास ठेवला आणि मला प्रोत्साहन दिले. महिला दिनानिमित्त माझा संदेश एवढाच की प्रत्येक मुलीत स्वप्ने पूर्ण करण्याची ताकद असते. मेहनत, आत्मविश्वास आणि कुटुंबाची साथ असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही.





# कुटुंबातील स्त्री सशक्त बनली पाहिजे


ज्योती शेटे
योग शिक्षिका, पंढरपूर

जर कुटुंब निरोगी बनवायचे असेल तर प्रत्येक कुटुंबातील स्त्री ही सशक्त बनली पाहिजे. त्यासाठी प्रत्येक स्त्रीने नियमीत व्यायाम करणे गरेजेचे आहे. महिलांना घरात राहून संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडीत योग प्रशिक्षणाद्वारे नियमित व्यायाम करणे शक्य आहे. त्यामुळे महिलांनी योगाचे प्रशिक्षण जरुर घ्यावे. ज्योती शेटे मागील २० वर्षापासून महिलांना निरोगी, सशक्त बनविण्यासाठी मोफत व्याख्याने देवून योग साधना तसेच निसर्गोपचाराचे महत्व सांगत आहेत. ऐवढ्यावरच त्या थांबत नाहीत तर खास महिलांसाठी अत्यल्प शुल्क आकारुन शास्त्रोक्त पध्दतीने योगवर्गांचे देखील त्या आयोजन करीत आहेत. आज पर्यंत सुमारे दीड हजार ते दोन हजार महिला तसेच युवतींना योगा बद्दलचे मार्गदर्शन करुन शास्त्रोक्त पध्द-तीने योगाचे प्रशिक्षण त्यांनी दिले आहे. त्यांच्याकडून म ार्गदर्शन घेतलेल्या ४० ते ५० महिला तसेच युवती आज योग साधने बद्दल इतरांना प्रशिक्षित करीत योगाचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत.



# करकंबच्या नारीशक्तीची विविध क्षेत्रात तेजस्वी भरारी

**जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव दरवर्षी ८ मार्च रोजी महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो.राजकारण, विज्ञान, कला, संस्कृती व इतर विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान व्हावा,महिलांमध्ये समान हक्कासाठी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने जागतिक महिला दिवस साजरा करण्यात येतो. विविध क्षेत्रात स्वकष्टाने स्वतःचे कर्तुत्व सिद्ध करून करकंब गावचे नाव उज्वल करणाऱ्या महिला भगिनींच्या कार्यकर्तुत्वावर टाकलेला प्रकाश.**


भाग्यश्री जोशी
करकंब


करकंब येथील भाग्यश्री नरहरी जोशी या संसाररुपी गाडा हाकत असताना कुटुंबीयांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने उन्हाळ कामातील गृहउपयोगी उत्पादन गृह उद्योगाच्या माध्यमातून करत असतात.त्यांच्या सुनबाई अपूर्वा जोशी यांचे शिक्षण एम.कॉम.पर्यंत झाले असले तरी त्याही आपल्या सासूबाईंना या व्यवसायात मदत करतात. आर्थिक उत्पन्न कुटुंबीयांसाठी खर्च करत असल्याने घरातील पुरुष मंडळींचीही आर्थिक ओढाताण कमी होण्यास मदत


आरती घाडगे

करकंब येथील आरती घाडगे यांनी कुटुंबीयांना आर्थिक मदत व्हावी या दृष्टीने भाजीपाल्याचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी त्या आठवडी बाजारामध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय करतात.त्यांना या आठवडा बाजारांमधून सरासरी ५०० ते १२०० रुपयांचा फायदा होतो. त्यांच्या या आर्थिक प्राप्तीमुळे घर-ातील कुटुंबीयांची होणारी आर्थिक ओढाताण कमी होण्यास मदतच होत असते.


रेश्मा टेके
करकंब

या सध्या उजनी कॉलनी वसाहत करकंब येथे अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. मातृवंदन, विधवा महिला, नवजात बालकांना अन्नप्राशन, बेबी किट वाटप व शासनाच्या इतर सर्व सरकारी योजना प्रभावीपणे राबवून त्या संबंधित माता पालक व बालकांपर्यंत पोचविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतात.त्यामुळे माता पालक व बालकांची प्रकृती निरोगी राहण्यास मदत होते.त्यामुळे मनाला एक प्रकारचे वेगळेच समाधान लाभते.


अर्चना कापसे
करकंब

अर्चना कापसे यांनी विवाहानंतर शेतीविषयक कोणतीही माहिती नसताना शेतीपूरक दुग्ध व्यवसाय सुरू केला. या दुग्ध व्यवसायातून त्या वर्षाकाठी २ ते२.५ लाखांचे उत्पन्न मिळवतात. त्या स्वतः गाईंच्या धारा काढणे,पशुखाद्य देणे, गोठ्यांची साफसफाई करणे, फळबागा, पालेभाज्या व इतर पिकांवरती फवारणी करणे,शेती विषयक कामे करून संसाराला हातभार लावतात.


मिनाक्षी माळी
करकंब

आरोग्य सेविका उपकेंद्र करकंब,प्रा. आरोग्य केंद्र उंबरे (पागे) येथे कार्यरत.आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करण्याची मिळत असलेली संधी हे त्या आपले भाग्यच समजतात.कोविड काळामध्येही त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्राणाची पर्वा न करता केलेले काम अविस्मरणीय असेच होते.कोणत्याही आजाराची लागण होऊ नये याची प्रामुख्याने जबाबदारी आरोग्य कर्मचाऱ्यांवरतीच असते.ती जबाबदारी त्या आरोग्य शिक्षण व लसीकरणाद्वारे पार पाडतात. सहकारी,पती व कुटुंबीयांचीही मोलाची साथ लाभते.


स्वाती काकडे
करकंब

संचालिका विठाई लोकसंचलित साधन केंद्र पंढरपूर बचत गट. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या महिलांसाठी बचत गट हा मोठा आधार आहे.या बचत गटाच्या माध्यमातून शेळीपालन, कुक्कुटपालन व इतरही विविध व्यवसाय करत त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून त्यांना संसाराचा गाडा हाकण्यासाठी हातभार लागतो. या विचारातूनच स्वाती काकडे यांनी बचत गटाची स्थापना करून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्या प्रयत्न करतात. शिक्षण व आर्थिक अडचणींची सोडवणूक करण्यासाठी या बचत गटांमुळे खूपच मदत होते. त्यांना या बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्यामुळे समाधान मिळते.


शैलजा मुखरे
करकंब

शैलजा मुखरे या आरोग्य विभागामध्ये अशा गटप्रवर्तक म्हणून कार्यरत आहेत. आशा कर्मचाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना सामावून घेण्याचा त्या नेहमीच प्रयत्न करतात. कोविडच्या कालावधीत त्यांनी केलेल्या कार्याबद्दल वेगवेगळ्या शाळा, शैक्षणिक संस्था व ग्रामपंचायतकडून त्यांना कोविड योद्धा म्हणून पुरस्कार प्राप्त झाले. त्यांचे पती भारतीय संरक्षण दलात आहेत. रुग्णांची सेवा केल्याचे मनाला वेगळेच समाधान मिळते अशा प्रकारच्या भावना त्या व्यक्त करतात.


विद्या बुगड
करकंब

विद्या बुगड या ब्युटीपार्लर व्यवसायात कार्यरत आहेत. ब्युटीपार्लर बरोबरच नवीन पिढीला प्रशिक्षणही देतात. परिसरातील महिलांमध्ये विशेष लोकप्रियता मिळवली आहे.घर आणि व्यवसाय यांचा समतोल राखत इतर महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.त्यांनी महिला दिनानिमित्त महिला वर्गास शुभेच्छा दिल्या.

# सक्षम स्त्रीत्वाची प्रेरणादायी वाटचाल


डॉ. कविता अंधारे
बार्शी

समाजात अनेक स्त्रिया आपल्या कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण करतात. त्यापैकी एक म्हणजे कविता संजय अंधारे. बार्शी येथील प्रसिद्ध हृदयतज्ज्ञ डॉ. संजय अंधारे यांच्या त्या पत्नी असल्या तरी त्यांनी केवळ त्या ओळखीवर न थांबता स्वतःची स्वतंत्र वाट निवडली. इ.डल. व इतर पदव्या घेत त्यांनी न्यूट्रिशन, आहारतज्ज्ञ आणि समुपदेशन क्षेत्रा-तही अभ्यास केला. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवले. उत्तम वक्तृत्व, नृत्यकला आणि विविध कलागुणांमुळे त्या बहुगुणी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात. समंजस पत्नी, प्रेमळ आई आणि प्रेरणादायी स्त्री म्हणून त्यांची वाटचाल अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.

# समाजकारण आणि राजकारणातील संवेदनशील नेतृत्व



ॲड. मिनल साठे
माढा

माढा नगरीच्या नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे यांना राजकारणरूपी काटेरी कॅक्टसवर उगवलेलं दुर्मिळ फुल असून समाजाच्या सर्व घटकाविषयी आपुलकी आणि संवेदनशीलता अंगी असणारे नेतृत्व म्हणुन ॲड. मीनल साठे यांच्याकडे पाहिले जात आहे.
राजकारण आणि सत्ताकारणाने बजबजलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नगराध्यक्षा म्हणून काम करताना माढ्यासह संपूर्ण तालुक्यात महिलांचे मोठे संघटन त्यांनी तयार केले आहे. जुन्या रूढी परंपरा यामुळे क्वचितच बाहेर पडणाऱ्या तमाम स्त्रियांना मानसिकरित्या कणखर बनवीत स्वावलंबी बनवले. असुरक्षिततेची भावना मनातून काढतानाच स्त्री ही अबला नसून सबला आहे हे दाखवून दिले. पुरूष केंद्रीत राजकारण महिला केंद्रीत बनवताना आपल्या सखींना सोबत घेत माढा नगरपंचायतीची सलग दोनदा सत्ता काबीज करुन राजकारणातील कर्तबगार स्त्री म्हणून माढ्यात इतिहास रचला

# सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेल्या डॉ. सोनवणे


कॅप्टन प्रा. डॉ. विजया सोनवणे
करमाळा

कॅप्टन प्रा. डॉ. विजया सोनवणे या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी एनसीसी म्हणजेच राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून अनेक मुला मुलींना पोलीस व अग्नीवीर तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये करिअर करण्याचे धडे दिले आहेत. त्यांच्या प्रोत्साहनाने महाविद्यालयात ४२ मुली राष्ट्रीय छात्र सेनेत सहभागी आहेत. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे एक मोठे कार्य त्यांच्या टीम कडून केले जाते. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि एकतेची भावना, सहकार्याची भावना निर्माण केली जाते. त्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये भूगोल या विषयाच्या विभाग प्रमुख आहेत. प्रा. डॉ. विजया सोनवणे या पांगरे गावच्या सरपंच असून त्या नेहमीच सामाजिक कार्यामध्येही अग्रेसर असतात.


मयूरा पवार
करकंब

मयूरा पवार या सध्या पेट्रोल पंपावर कार्यरत आहेत.पेट्रोल पंपावरती काम करणाऱ्या करकंबमधील त्या पहिल्या महिला कर्मचारी आहेत.एक महिला पेट्रोल पंपावर काम करत असल्याचे पाहून ग्राहकांना आश्चर्य मिश्रित कुतूहल वाटते.

आपल्या तान्या बाळासाठी हिरकणी गड चढून गेली त्याप्रमाणे मी माझे कर्तव्य पार पाडत आहे.अश्या प्रकारच्या भावना त्यांनी केल्या.त्या स्वतः मुलांचे शिक्षण व संसार यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात.

# घर, कार्यालय अन् आरोग्याची सांगड घालावी


सीमा होळकर
विशेष भूसंपादन अधिकारी

खासगी किंवा प्रशासकीय नोकरी करताना महिलावर्गाने आपले नोकरीचे ठिकाण, घर आणि आरोग्याची काळजी घेवून आनंदी जीवन जगावे. मी पुण्याच्या एसपी कॉलेजला पदवी मिळविली अन् प्रशासनात काम करण्याचा दृढनिश्चय केला. याज्ञान प्रबोधिनी संस्थेत स्पर्धा परीक्षेचे वर्ग लावले आणि पहिल्याच प्रयत्नात नायब तहसीलदार म्हणून पद मिळविले. प्रारंभी २ वर्षे कोकणात नोकरीस गेले आणि यानंतर पुणे विभागीय कार्यालय ५ वर्षे आणि पुणे आयुक्त कार्यालयात ५ वर्षे नोकरी केली. यानंतर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात पुरवठा विभाग आणि जिल्हा प्रशासनात काम पाहिले.

सध्या मी विशेष भूसंपादन अधिकारी (क्र.७) म्हणून सोलापूर जिल्हा प्रशासनात काम पाहत आहे. सध्या माझ्याकडे पंढरपूर, मोहोळ तालुक्यासह पालखी मार्गाचे भूसंपादनाचे काम आहे. जागा, जमीन बाधित शेतकरी, नागरिक आणि शासनाच्या संबंधित खात्याचा योग्य समन्वय ठेवून माझे काम काज मी योग्य रितीने पार पाडत असते. नोकरीच्या ठिकाणी मी महिला आहे...हे कसे करू.. वगैरेचा विषय मी आजवर ठेवलाच नाही. शासनाचे चालू केलेल्या झिरो पेंडन्सीवर तर मी पीएचडी पदवी मिळविली आहे. यामुळे कोणत्याही महिलेने आव्हान मी नोकरी स्वीकारल्यास चोखपणे आणि खणखणीत काम करून दाखवावे...पदे आपोआप मिळत जातात. याचबरोबर नोकरीचे कार्यालय, स्वत:चे घर आणि आपले स्वत:चे आयोग्य याचा योग्य समन्वय ठेवला पाहिजे. या गोष्टी आपण पार पाडल्या तर संपूर्ण कुटुंब आनंदीत ठेवण्याची क्षमता आपल्याकडे येते.

# कर्तृत्व आणि दातृत्वाचा संगम



ज्ञानेश्वरी देवकर
उपमहापौर



कुटुंबाचा आधार आणि समाजाचा विकास या दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या लिलया पेलत सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आज महिला सक्षमीकरणाचा एक नवा आदर्श निर्माण करत आहेत. नगरसेवक ते उपमहापौर हा त्यांचा प्रवास जिद्द, चिकाटी आणि देवकर कुटुंबाच्या सामाजिक व पर्यावरण संवर्धनाच्या वारशातून साकारला आहे. मी स्वतः एक आई, गृहिणी आणि सून म्हणून कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असतानाच लोकांच्या सेवेसाठी मैदानात उतरले आहे. जर कुटुंबाचा भक्कम आधार आणि स्नेह पाठीशी असेल, तर कोणतीही म हिला आत्मविश्वासाने आणि स्वाभिमानाने समाजात उभी राहू शकते, असे प्रतिपादन त्यांनी महिला दिनानिमित्त केले. तरुण वयात मिळालेल्या उपमहापौरपदाच्या संधीचा उपयोग त्या केवळ सत्ता म्हणून नव्हे, तर लोककल्याणाचे आणि निसर्ग रक्षणाचे माध्यम म्हणून करत आहेत. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या म ाध्यमातून तळागाळातील महिलांना सक्षम करणे, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे आणि शैक्षणिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे. विशेषतः कष्टकरी आणि गरजू महिलांना योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. 'प्रत्येक महिला सक्षम व्हावी', हाच ध्यास घेऊन त्या कार्यरत आहेत.

# कथ्थक : शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा 'नृत्यमंत्र'



मनिषा जोशी
ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना



आजच्या धावपळीच्या आणि 'रील'च्या युगात भारतीय शास्त्रीय नृत्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. सोलापूर शहरातील ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना मनीषा जोशी गेल्या ३५ वर्षांपासून या कलेचा वारसा नव्या पिढीकडे सोपवत आहेत.

शहरातील विविध शाळांमध्ये आणि सध्या दोन केंद्रांच्या माध्यमातून त्या कथ्थकचे प्रशिक्षण देत आहेत. विशेष म्हणजे, जोशी यांच्याकडे ५ वर्षांच्या चिमुरडीपासून ते ६५ वर्षांच्या ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिक नृत्याचे धडे गिरवत आ- हेत. कथ्थक हा केवळ एक कलाप्रकार नसून तो एक सर्वांगसुंदर व्यायाम आहे, असे त्या अभिमानाने सांगतात. या नृत्यामुळे शरीराची लवचिकता वाढतेच, पण एकाग्रता वाढल्याने मानसिक आरोग्यही सुधारते. सध्याच्या काळात जिथे पाश्चात्य नृत्याची ओढ वाढत आहे, तिथे मनीषाताईंनी शास्त्रीय नृत्याची गोडी कायम ठेवली आहे. त्यांच्या या दीर्घकालीन योगदानामुळे अनेक महिलांना आरोग्यासोबतच आत्मविश्वासाची नवी ओळख मिळाली आहे. कलेच्या माध्यम ातून आरोग्य जपण्याचा हा त्यांचा प्रवास खरोखरच कौतुकास्पद आहे.

# स्त्री प्रत्येक भूमिकेला न्याय देते



पूजा जमादार
भारतीय टपाल विभाग

स्त्रीला समान संधी, दर्जेदार शिक्षण आणि कुटुंबातील सकारात्मक वातावरण मिळाले तर ती कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करू शकते. स्त्री हा शब्द उच्चारला की त्यात ममत्व, त्याग, सामर्थ्य आणि जिद्द या सर्व गुणांचे तेज एकत्रित दिसते. तिच्या कष्टांवर, संयमावर आणि प्रेमळ स्वभावावर घरांचे घरपण उभे असते; आणि तिच्या दूरदृष्टीवर, शिक्षणावर व कर्तृत्वावर समाजाची प्रगती अवलंबून असते. आजची स्त्री घर सांभाळत असतानाच शिक्षण, व्यवसाय, संशोधन, प्रशासन, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत स्वतःची ठाम ओळख निर्माण करत आहे. ती केवळ कुटुंबाचा आधार नाही, तर आत्मनिर्भर, निर्णयक्षम आहे. घर-संसार असो की नोकरी-व्यवसाय, स्त्री आपल्या प्रत्येक भूमिकेला न्याय देत आयुष्याला दिशा देते. संकटसमयी तिची धैर्यशील वृत्ती कुटुंबाला आधार देते. स्वप्न पाहा, त्यासाठी लढा आणि स्वतःची नवी ओळख निर्माण करा. हाच स्त्रीशक्तीचा संदेश आहे.

# पूर्वीचे काही भाग्य म्हणूनच रुक्मिणीमातेची सेवा



हेमा अष्टेकर
महिला पुजारी

येथील विठ्ठल मंदिरात १ ऑगस्ट २०१४ पासून महिला पुजारी म्हणून रुक्मीणीमातेकडे हेमा अष्टेकर या सेवा बजावित आहेत. त्या पंढरपूरच्याच रहिवासी आहेत. आपले पूर्वीचे काही भाग्य म्हणूनच महाराष्ट्राची

दक्षिणकाशी म्हणून ओळख असलेल्या तिर्थक्षेत्र पंढरपूरातील विठ्ठल मंदिरात साक्षात रुक्मिणीमातेची सेवा करण्याची संधी आपणाला मि ळाली आहे. सुरुवातीला जेव्हा मंदिरात महिला पुजारी म्हणून नवीन रुजू झाले त्या अगोदर प्रशिक्षण कालावधी मध्ये मंदिरातील त्यावेळचे कर्मचारी असलेले श्री.ताठे यांनी रुक्मिणीमातेच्या पोशाखा बद्दलचे प्रशिक्षण दिले. मंदिरा- तीलच संदीप कुलकर्णी यांनी श्रीसुक्त आणि इतर मंत्रोपचाराचे प्रशिक्षण दिले. सुरुवातीला नवीन असताना आषाढी, कार्तिकी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या, उपमुख्यमंत्र्या किंवा अन्य ज्येष्ठ मंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या रुक्मिणी-मातेच्या महापूजेच्यावेळी थोडं टेन्शन असायचे. पण कालातंराने मंदिरात रुळल्यानंतर आता नियमित सेवा करीत असल्याने आईसाहेबांच्या सेवेची सवय झालेली आहे. ज्या विठ्ठल, रखुमाईच्या एका सेकंदाच्या दर्शनासाठी तासन् तास पदस्पर्श दर्शन रांगेत उभे असलेल्या भक्तांना दर्शन झाल्यावर काय समाधान मिळते ते आपणाला मंदिरात रुक्मि णीमातेची सेवा करताना भक्तांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरच्या आनंदाने समजुन येते, दर्शनानंतरच्या भक्तांच्या चेहऱ्यावरील आनंद अनुभवयाला मिळतो, असे आष्टेकर सांगतात.



### रुक्मिणी मातेचे पुजारी म्हणून बहुधा राज्यात अथवा देशात पहिलीच नियुक्ती

पहाटे २.५० पासून दिनक्रम सुरु असून पहाटे चार वाजता रुक्मिणी मातेचा (राहि–सत्यभामा) यांचा काकडा व रुक्मिणीमातेची नित्यपुजा. साधारण दीड तास पुजा चालते. सकाळी साडेदहा वाजता तिचा पुन्हा म ळवट आणि नैवेद्य केला जातो. पुन्हा दुपारी चार वाजता पोशाख व संध्याकाळी सात वाजता धुपारती केली जाते. दररोज रात्री साडे दहा वाजता पाद्यपूजा व शेजारती केली जाते. प्रत्येक उपचार वेगवेगळ्या पध्दतीने आणि शास्त्रोक्त केले जातात.

# राजकारणात महिलांची वाढती भूमिका



सुधा अळ्ळीमोरे
शहर जिल्हा सरचिटणीस, भाजपा

आजच्या काळात महिलांनी कोणावरही अवलंबून न राहता आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात स्वतः सक्षम बनणे आवश्यक आहे. स्वतःची सुरक्षा, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढविणे ही काळाची गरज आहे. मुलींना शिक्षण देणे ही पालकांची मोठी जबाबदारी असून शिक्षणामुळे महिलांना स्वावलंबी होण्याची ताकद मिळते. सध्या शासनाच्या विविध योजनांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. एकेकाळी राजकारण हे केवळ पुरुषांचे क्षेत्र म ानले जात होते. मात्र आता ही धारणा बदलत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते विविध राजकीय पातळ्यांवर महिलांचे नेतृत्व आणि योगदान वाढत आहे. समाजकारणातून पुढे येत महिलांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला तर समाजाच्या विकासासाठी नवी दिशा मिळू शकते. त्यामुळे महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन नेतृत्व स्वीकारणे आवश्यक आहे.

# महिलांसाठी आधारवड बना



रेखा मळेवाडी
संस्थापिका, ओम इंग्लिश मिडियम

जागतिक महिला दिना'निमित्त समाजातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव होत असताना, श्री महालक्ष्मी महिला विकास व बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका रेखा मळेवाडी यांचे कार्य दीपस्तंभासारखे उभे आहे. त्यांचा जीवनप्रवास केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. रेखाताईंनी कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि आईपण स्वीकारल्यानंतरही शिक्षणाची जिद्द सोडली नाही. त्यांनी मराठी आणि राज्यशास्त्र अशा दोन विषयांत एम.ए. पूर्ण करून बी.एड.ची पदवी मिळवली. ही शैक्षणिक जिद्दच त्यांच्या पुढील कार्याचा पाया ठरली. २००९ मध्ये त्यांनी संस्थेची स्थापना करून बचत गट, शिवण क्लास आणि ब्युटी पार्लरच्या माध्यमातून शेकडो गरजू व विधवा महिलांना स्वावलंबी बनवले. २०१७ मध्ये त्यांनी ओम इंग्लिश मीडियम स्कूल'ची मुहूर्तमेढ रोवली. तळागाळातील आणि मोलम जुरी करणाऱ्या महिलांच्या प्रगतीसाठी धडपडणाऱ्या रेखाताई खऱ्या अर्थाने समाजासाठी 'आधारवड' ठरल्या आहेत. त्यांच्या या 'फायटिंग स्पिरिट'ला सलाम.

# डॉक्टरकी सोडून उद्योगात घेतली 'उत्तुग भरारी'



डॉ. राजलक्ष्मी
गायकवाड उद्योजिका



गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. रविराज गायकवाड आणि डॉ. राजलक्ष्मी गायकवाड हे दांपत्य तामलवाडी पंचक्रोशीत रूग्णसेवेसाठी तसं नावाजलेलं. २० ते २५ बेडचं सुसज्ज हॉस्पिटल. डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांनी १५ वर्षे डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून डॉक्टरकी पेशात मोठे नाव मिळविले; सुयोग फाऊंडेशनच्या माध्यमातून गरिबांच्या मुलांना अत्यल्प फीमध्ये शिक्षण, युवक-युवतींसाठी कार्यशाळा, अभ्यासिका केंद्र, महिला काँग्रेस धाराशिवच्या १० वर्षे अध्यक्षा राहिल्या. यामुळेच अत्यल्प काळात त्यांना शासकीय-खासगी संस्थांचे २२ पुरस्कार मिळाले. मात्र एके दिवशी वडिलांप्रमाणे उद्योजक होण्याचे आपले स्वप्न राहिले असल्याचे मत त्यांचे पती डॉ. रविराज गायकवाड यांच्याकडे व्यक्त केले आणि डॉक्टरांनी लागलीच उद्योजक होण्यासाठी होकार दिला. यामुळे वडील प्रा. शिव- ाजीराव काळुंगे, मातोश्री शोभा काळुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राजलक्ष्मी गायकवाड आणि त्यांचे चिरंजीव सुयोग गायकवाड यांनी लागलीच पंढरपूर तालुक्यातील सीताराम महाराज साखर कारखाना चालवायला घेतला. यात ऊस उत्पादक आणि कारखाना कर्मचाऱ्यांची सांगड घालत चांगले यश मिळविले आणि अवघ्या २ वर्षातच आष्टी शुगर, आष्टी याचेही काम चालू केले. इतकेच नाही तर सध्या श्री सद्गुरु सीताराम महाराज अर्बन को. ऑप. बँक, मंगळवेढा याचीही मुहूर्तम ेढ रोवली. याचबरोबर धनश्री महिला ग्रामीण पतसंस्थेच्या १५ शाखा, धनश्री मल्टिस्टेट को. ऑप. ३५ शाखांचा कारभार डॉ. राजलक्ष्मी यांनी हाती घेतला आहे. मुलगा सुयोगला घेवून अहोरात्र काम करून डॉ. राजलक्ष्मी यांनी पहिल्या महिला साखर कारखानदार म्हणून महाराष्ट्रात लौकिक मिळविला आहे.

# उसाच्या गोडीत शोधला सुखाचा गोडवा



विमल माने
सोलापूर

उसाच्या गोडीतच आपल्या संसाराचा रस जपणाऱ्या विमल माने गेल्या १८ वर्षांपासून तीन मुलांसह स्वतंत्रपणे आयुष्याचा प्रवास करत आहेत.

प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता त्यांनी कष्टाची वाट निवडली. सुरुवातीला स्वतःच्या घरातील धुणी-भांडी करताना शेजाऱ्यांचीही कामे स्वीकारली. त्यानंतर उदरनिर्वाहासाठी भाजी विक्रीचा व्यवसाय सोलापुरातील होटगी रोडवरील दै. तरुण भारतच्या कार्यालयासमोर सुरू केला. २०१४ नंतर त्यांनी त्याच जागेवर नाश्त्याचे विविध पदार्थ विकण्यास सुरुवात केली. बदलत्या गरजा आणि ग्राहकांच्या आवडी लक्षात घेऊन त्यांनी व्यवसायात सातत्याने बदल केले. सध्या वाढत्या उन्हामुळे गेल्या महिन्यापासून त्यांनी उसाच्या रसाचा गाडा सुरू केला आहे. कडक उन्हात थंडगार उसाच्या रसाला सोलापूरकरांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून दररोज समाधानकारक उत्पन्न मिळत आहे. तीन मुलांचे संगोपन आणि शिक्षणाची जबाबदारी सांभाळत त्यांनी संसाराची गाडी एकहाती पुढे नेली आहे. संघर्ष, जिद्द आणि मेहनत यांच्या जोरावर उभा केलेला त्यांचा प्रवास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी कष्टाची तयारी आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल, तर यशाचा गोडवा नक्कीच चाखता येतो, हे विमल माने यांच्या वाटचालीतून स्पष्ट होते.




# स्वकर्तृत्वाने ओळख निर्माण करावी



अश्विनी निकत
संचालिका ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट, करमाळा




प्राचीनकाळी भारतात मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. आजही भारतीय संस्कृतीमध्ये महिलांना आदराचे स्थान दिले जाते. महिलांनी स्वतःच्या कर्तुत्वाने पुढे येऊन शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, उद्योग अशा क्षेत्रामध्ये वेगळी ओळख निर्माण करावी. महिलांमध्ये ते कौशल्य असते, त्यांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव होणे गरजेचे आहे. जागतिक महिला दिनानिमित्त मला असे वाटते की, महिला ही अबला नसून सबला आहे. मी करमाळा शहरांमध्ये ग्लोबल इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणाचे धडे देत असते आणि सर्व क्षेत्रांवर स्वकर्तृत्वाने स्वतःची मोहर उटवीत असते.




होताना कोणाच्या
जाहिरातींचं पानं...
कसा राखावा स्वतःचा सन्मान
ठरवता आलं पाहिजे...
स्वार्थी मुखवट्यांच्या जगात
सहजच विसरताना भान...
कोणत्या दिशेने चालायचे
ठरवता आलं पाहिजे...
वाऱ्यासारखं वाहताना
वारा होता आलं पाहिजे
सुगंधित की विषारी हे...?
हे... ठरवता आलं पाहिजे...

गगनभरारीचं बळ
पंखांध्ये आणताना
पंख कबुतराचीं की गरुडाचीं
हे... ठरवता आलं पाहिजे
संभ्राच्या वाटा सैरभैर
राखताना लेखणींचा सन्मान
मुद्रा कुठे उमटवायचीं
हे... ठरवता आलं पाहिजे
खळाळणाऱ्या प्रवाहात
वाहता आलं पाहिजे
कचरा सारा दूर सारून
शुद्ध होता आलं पाहिजे...
सकारात्मक पावलासवे योग्य दिशेने
जाता आलं पाहिजे
पण... वाहन हे कोणतं...?
हेहीं ओळखता आलं पाहिजे
शेवटीं आपणच असतो
जेव्हा आपले शिल्पकार
स्वस्त होणार नाहींच कधीं
असं... बाणेदार होता आलं पाहिजे...

प्रा. विजया मारोतकर



# ब्युटी क्षेत्रात सातत्य आणि कौशल्याला वाढती संधी



भावना डिंगरे
ब्युटी आर्टिस्ट

गेल्या ३३ वर्षांपासून मी ब्युटी क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. पूर्वी या क्षेत्राकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. मात्र आज अ‍ॅडव्हान्स तंत्रज्ञान आणि व्यावसायिक प्रशिक्षणामुळे या क्षेत्राला वेगळी ओळख मिळाली आहे. सौंदर्यसेवा ही केवळ छंद नसून करिअरची उत्तम संधी ठरू शकते. वेळेनुसार या व्यवसायात कामाचे नियोजन करता येते. त्यामुळे महिलांसाठी हे क्षेत्र अधिक सोयीचे आहे. सतत बदलणारे ट्रेंड, आधुनिक उपकरणे आणि ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. कौशल्य, संयम आणि ग्राहकांशी संवादकौशल्य यांच्या जोरावर या क्षेत्रात यश मिळवता येते. आज अनेक महिला स्वतःचा ब्युटी पार्लर सुरू करून स्वावलंबी होत आहेत. योग्य प्रशिक्षण आणि आत्मविश्वास असेल तर ब्युटी उद्योग हा महिलांसाठी सक्षम करिअरचा मार्ग ठरू शकतो.

# महिलांना त्यांच्या हक्कांची, कायद्यांची माहिती असणे आवश्यक



अ‍ॅड. ज्योती अल्ली
सोलापूर

हे नारी तू घे भरारी, व्यापून टाक क्षितिजे सारी हा संदेश आजच्या महिला दिनानिमित्त अधिक महत्त्वाचा ठरतो. मी अ‍ॅड. ज्योती राजेंद्र अल्ली, सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच कौटुंबिक न्यायालयात वकील म्हणून कार्यरत असून प्रामुख्याने फॅमिली व सिव्हिल प्रकरणांवर काम करते. महिलांना त्यांच्या हक्कांची आणि कायद्यांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय संविधानाने महिलांना समानता, स्वातंत्र्य आणि सन्मानाचे अधिकार दिले आहेत. महिला दिन हा केवळ उत्सव नसून अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि कायदेशीर हक्कांसाठी जागरूक होण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. सशक्त महिला म्हणजे सशक्त समाज.

# आर्थिक सक्षमीकरणातून कुटुंबाचा विकास



गौरी आमडेकर
जनता बँक संचालक

महिलांनी घर सांभाळत असतानाच स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे काळाची गरज आहे. महिला ही कुटुंबाचा कणा असते. ती वैचारिक दृष्ट्या सक्षम झाली तरच घरातील निर्णयप्रक्रिया अधिक सक्षम होते. प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयात स्त्रियांचा सक्रिय सहभाग असायलाच हवा. केवळ परंपरा आणि संस्कृती जपून विकास साध्य होत नाही, त्यासाठी शिक्षण, आर्थिक जाण आणि दूरदृष्टी आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात आर्थिक व्यवहार करताना महिलांनी विशेष दक्षता बाळगली पाहिजे. कोणत्याही आमिषाला किंवा अज्ञात लिंकला बळी न पडता सजग राहणे अत्यंत गरजेचे आहे. बचत, गुंतवणूक आणि आर्थिक नियोजन यांचे मूलभूत ज्ञान प्रत्येक महिलेला असावे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तर संपूर्ण कुटुंब सुरक्षित आणि स्थिर राहते. त्यामुळे महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कुटुंब आणि समाजाने सकारात्मक पाठबळ द्यावे.



# अपार कष्टाने संसाराचा मळा फुलवणारी माता

## रुक्मिणी मस्के

**नांदगाव (ता. मोहोळ) येथील सौ. रुक्मिणी दगडू मस्के यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अपार कष्ट करून संसाराचा मळा फुलवला. कष्टातच विठ्ठल दिसतो, या भावनेने त्यांनी आयुष्यभर मेहनत घेत कुटुंबाला उभारी दिली. सुमारे चाळीस वर्षे त्यांनी नांदगाव येथून रेल्वेने भाजीपाला सोलापूर येथे आणून विक्री केली आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नावर मोठा संसार सांभाळला.**

निमित्त
राजाराम मस्के
सोलापूर.



रुक्मिणीबाई यांचा जन्म गुळवंची येथे आप्पाराव कदम यांच्या घरी झाला. वडिलांचे पहिले कुटुंब प्लेगच्या साथीत नष्ट झाले होते. त्यानंतर नातेवाईकांच्या समजुतीने तिऱ्हे येथील जाधव कुटुंबातील त्यांच्या आईशी विवाह झाला. रुक्मिणीबाई या घरातील पहिल्या अपत्य होत्या. त्यांना उत्तम कदम, मारुती कदम, हरिदास कदम, बाळासाहेब कदम असे चार भाऊ तसेच राहिबाई पवार, जाईबाई भिंगारे आणि शाहूबाई धपाटे अशा बहिणी आहेत. आईच्या माहेरच्या बाजूने मामा-मावशींच्या कुटुंबाचेही घराशी जिव्हाळ्याचे संबंध होते.

अवघ्या दहाव्या वर्षी त्यांचा विवाह दगडू मस्के यांच्याशी झाला. सासरे संदीपान मस्के रेल्वेत गँगमन म्हणून कार्यरत होते, तर सासूबाई ताणूबाई घरकाम पाहत असत. मोठे कुटुंब आणि प्रचंड गरिबी या परिस्थितीत संसार सांभाळताना रुक्मिणीबाईंना अनेक संकटांचा सामना करावा लागला. घरातील गरज ओळखून त्यांनी शेतीत भाजीपाला पिकवण्यास सुरुवात केली आणि तो सोलापूर येथे विकू लागल्या. सुरुवातीला गवत, गौऱ्या आणि सरपण रेल्वेने नेऊन विकण्याचे कामही त्यांनी केले. पुढे मुलं मोठी झाल्यावर सलगरवस्ती येथे जागा घेतली. कष्टाच्या जोरावर विहीर खणून पाणी उपलब्ध केले आणि भाजीपाला शेती वाढवली. त्यांच्या थोरल्या सुन कावेरी आणि भागाबाई यांनीही या कामात मोठी साथ दिली. त्यांना आठ अपत्ये असून सर्वांची लग्ने झाली आहेत. आज त्यांच्या कुटुंबात दहा नातू आणि बारा नाती आहेत. सर्वजण आपापल्या क्षेत्रात स्थिरावले आहेत. विशेष म्हणजे आपल्या भावाच्या चार मुलींची लग्ने त्यांनी आपल्या चार मुलांशी लावली, ही बाब अत्यंत दुर्मीळ मानली जाते. त्यांचे मोठे चिरंजीव पांडुरंग शेती करतात, दामोदर जयशंकर हॉटेलमध्ये वस्ताद आहेत, श्यामराव रेल्वे गोदामात काम करतात, भीमराव बँकेत नोकरी करून एलआयसीचे काम करतात, अर्जुन शिक्षक आहेत, तर राजाराम 'तरुण भारत'मध्ये कार्यरत आहेत. मुलगी शारदा पवार यांचा संसारही सुखाने सुरू आहे. रुक्मिणीबाई आणि त्यांचे पती हे वारकरी संप्रदायाचे अनुयायी असून त्यांनी आषाढी वारी कधीही चुकवली नाही. कष्ट, प्रामाणिकपणा आणि सत्संग यांची जोड त्यांनी आयुष्यभर जपली. २०२२ साली त्यांच्या लग्नाचा ७५ वा वाढदिवस मुलांनी नांदगाव येथील शेतात मोठ्या उत्साहात साजरा केला.

आज रुक्मिणीबाई ऐंशी वर्षांपुढे असून त्यांचे पती नव्वदी ओलांडले आहेत. आरोग्याच्या कारणामुळे सध्या ते सलगरवस्ती येथे वास्तव्यास आहेत. आयुष्यभर कष्ट करून संसार फुलवलेल्या या मातोश्री आजही देवाचे नामस्मरण करत समाधानी जीवन जगत आहेत. महिला दिनाच्या निमित्ताने अशा कष्टकरी, जिद्दी आणि प्रेरणादायी मातेला मानाचा मुजरा.


# स्वतःचे आरोग्य जपा; तेच खरे स्वातंत्र्य





डॉ. गायत्री देशपांडे
प्रा. शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी स्वतःसाठी वेळ काढणे खूप अवघड ठरते. रुग्णसेवा, कुटुंब आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. अनेकदा आरोग्याच्या तक्रारी वाढल्यानंतरच दरवाजा ठोठावतात. ही प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. महिलांनी कुटुंबाला प्राधान्य देतानाच स्वतःलाही तितकेच महत्त्व द्यावे. नियमित तपासणी, संतुलित आहार, व्यायाम आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. महिला-पुरुष समानता ही केवळ संकल्पना नसून आचरणातही दिसली पाहिजे. स्वतःचे वैशिष्ट्य, कला आणि क्षमता जपणे म्हणजेच खरे स्वातंत्र्य. महिला सशक्त असेल तर कुटुंब आणि समाजही सुदृढ राहतो. त्यामुळे 'स्वतःला प्राधान्य' हा मंत्र प्रत्येक महिलेने स्वीकारणे हीच काळाची गरज आहे.





# सशक्त नारीच सशक्त समाज घडवते

स्नेहल पेंडसे
योग प्रशिक्षका

योगाच्या क्षेत्रात करिअर हा महिलांसाठी सक्षमता आणि स्वावलंबनाचा उत्तम मार्ग आहे. २०० किंवा ३०० तासांचा योगशिक्षक पदविका वर्ग झाल्यानंतर योग शिक्षिका म्हणून स्टुडिओ, जिम किंवा वेलनेस सेंटर येथे काम मिळू शकते. योगाच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या स्वास्थ्या बरोबरच उत्पन्नाचा एक उत्तम स्रोत देखील निर्माण होऊ शकतो. ज्यामध्ये वीस पंचवीस हजार पासून एक ते दीड लाखांपर्यंत प्रतिमाह उत्पन्न मिळू शकते. करिअर म्हणून सध्याच्या काळात योग ला उत्तम संधी उपलब्ध आहेत. पुरुषांपेक्षा देखील महिलांमध्ये योगविषयक जागृती समाजामध्ये जास्ती आढळते, त्यामुळे महिला शारीरिक व मानसिक दृष्ट्या समर्थ होतात आणि तणावाचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे करू शकतात. सशक्त नारीच सशक्त समाज घडवते.



# स्त्रीच्या जिद्दीला आज नवे आकाश



सीमा भंडारी,
पद्मश्री सुमतिबाई
इंग्लिश मिडियम टेक्निकल हायस्कूल

गेल्या ३३ वर्षांपासून मी टेक्निकल निदेशक या पदावर नोकरी करत आहे. नोकरी करत असताना अनेकदा तारेवरची कसरत करावी लागली. घर आणि काम यांचा समतोल साधताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. शिक्षणाचा खरा फायदा व्हावा आणि समाजातील वास्तव ओळखता यावे म्हणून नोकरी स्वीकारली. स्वतःचे संरक्षण कसे करावे, आत्मविश्वासाने कसे उभे राहावे हे धडे महिलांनी स्वतःच शिकले पाहिजेत. पूर्वी पुरुषप्रधान संस्कृतीमुळे ठाम राहणे कठीण होते. सुरुवातीला घरच्यांचा विरोधही सहन करावा लागला. मात्र काळानुसार परिस्थिती बदलली. आज महिलांना शिक्षण, नोकरी आणि करिअर घडविण्याचे स्वातंत्र्य अधिक प्रमाणात मिळत आहे. स्त्रीने स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून सातत्याने पुढे जात राहिले तर ती कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# विठ्ठल मंदिराच्याद्वारी 'अनुसया' यांची सडासंमार्जनची सेवा



अनुसया फसलकर
सडासंमार्जनची सेवा

श्री विठुरायाचे गरीब, श्रीमंत असे असंख्य भक्त दिसून येतात. प्रत्येक भक्ताची भक्ती करण्याची पध्दत वेगवेगळी असते. काहीजण श्री विठ्ठलाची पूजाअर्चा करुन भक्ती करतात तर काहीजण विठ्ठलाच्या चरणी दान अर्पण करुन भक्तीभाव निभावितात तर काहीजण नित्यसेवा करुन श्री विठ्ठलाप्रति आपली भक्ती समर्पित करीत असतात. येथील ७४ वर्षांच्या अशाच एक आजीबाई गेल्या ३० वर्षांपासून पहाटेच्या वेळी विठ्ठल मंदिराच्या प्रत्येकद्वारी सडासंमार्जन करुन श्री विठ्ठलचरणी आपली सेवा समर्पित करीत दररोज आनंददायी दिवसाची सुरुवात करतात.

येथील व्यासनारायण झोपडपट्टीत राहणाऱ्या अनुसया राजाराम फसलकर यांचा जन्म १९५२ मध्ये झाला. आपल्या आई बरोबर लहानपणी त्या दररोज श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पहाटे मंदिरात जात असत. त्यांच्या आईने देखील सुमारे तीस ते चाळीस वर्ष मंदिराच्या प्रवेशव्दारात सडा रांगोळी काढण्याची सेवा केली. त्यामुळे सहाजिकच त्यांच्यावर देखील हेच संस्कार झाले. त्यामुळे आईनंतर अनुसयाबाईंनी देखील आजतागायत ही सेवा पुढे चालू ठेवलेली आहे. अनुसयाबाईंचा दिवस पहाटे दोन ते अडीच वाजता सुरु होतो. वारा, पाऊस, थंडी यांची तमा न बाळगता दररोज पहाटे उठून आपले सर्वनित्यकर्म उरकुन साडेतीनच्या सुमारास त्या श्री विठ्ठल मंदिरा जवळ हजर असतात. विठ्ठल मंदिराच्या नामदेव पायरी जवळील संत चोखामेळा यांच्या समाधी समोर तसेच विठ्ठल मंदिराच्या नामदेव पायरी समोर अर्थात महाद्वारात, तसेच पूर्व, पश्चिम आणि दक्षिणव्दारा जवळ देखील सडाटाकून त्या रांगोळी काढतात. विशेष म्हणजे सण, वार असले की त्यांनी काढलेली रंगीबेरंगी रांगोळी नजरेत भरणारी असते. अनुसयाबाई केवळ विठ्ठल मंदिरातच रांगोळी काढीत नाहीत तर त्या येथील ताकपिठे मंदिरातील श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी देखील दररोज जातात. त्या मंदिराच्या प्रवेशद्वारात देखील त्या आकर्षक रांगोळी काढतात.

ऐवढच नव्हे तर चौफाळ्यातील गोपाळकृष्ण मंदिर, पुढे ज्ञानेश्वर मंडपातील ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात देखील त्यांचा रांगोळीचा नित्यक्रम असतो. त्यांना दररोज तब्बल एक किलो रांगोळी लागते. सणासुदीच्या दिवशी त्यांच्या रांगोळीमध्ये भरण्यासाठी लागणाऱ्या विविध रंगाचा हिशोब वेगळाच. आर्थिक परिस्थिती बेताची असताना देखील मोठ्या निस्वार्थ भावनेने त्यांची ही सेवा मात्र आजतागायत सुरु आहे आणि खरे म्हणजे हेच श्री विठ्ठलाप्रति असलेल्या त्यांच्या भक्तीचे द्योतक आहे.



# महिला सक्षमीकरणाची खरी सुरुवात शिक्षणापासून



डॉ. स्वाती बिले
संचालिका, जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल झरे, करमाळा

आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वीपणे पुढे जात आहेत शिक्षण, प्रशासन, विज्ञान, क्रीडा आणि उद्योग अशा अनेक क्षेत्रात त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. ८ मार्च महिला दिन हा महिलांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्याचा दिवस आहे. शिक्षण क्षेत्राशी जोडलेली व्यक्ती म्हणून मला वाटते की महिला सक्षमीकरणाची खरी सुरुवात शिक्षणापासून होते. मुलींना शिक्षण आणि योग्य संधी मिळाल्यास त्या आत्मविश्वासाने समाजात स्थान निर्माण करू शकतात. महिलाही केवळ कुटुंबाचीच नव्हे तर समाजाच्या प्रगतीची ही महत्त्वाची शक्ती आहे त्यामुळे प्रत्येकाने मुलींच्या शिक्षणाला आणि स्वप्नांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सक्षम महिला म्हणजेच सशक्त समाज आणि सशक्त राष्ट्र.

# नवीन क्षेत्राचा स्वीकार करावा




सीमा चाफळकर,
वास्तुशास्त्रज्ञ

कोणत्याही क्षेत्रात मनापासून, सातत्याने आणि प्रामाणिकपणे काम केले तर नक्कीच यश मिळते आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करता येते. स्त्रियांमध्ये जिद्द, चिकाटी आणि संवेदनशीलता या गुणांचा सुंदर संगम असतो. गेल्या ३५ वर्षांपासून वास्तुकला या क्षेत्रात कार्य करताना मला अनेक अनुभव मिळाले. घर, कार्यालय किंवा इमारतींच्या रचनेत वास्तुकलेचा विचार केला तर त्या ठिकाणी सकारात्मकता आणि संतुलन निर्माण होते. आजच्या काळात वास्तुकला-आर्किटेक्चर हे पारंपरिक ज्ञान, कला आणि आधुनिक विज्ञान यांची सांगड घालणारे एक उत्तम करिअरचे क्षेत्र देखील आहे. निरीक्षणशक्ती, संयम आणि सूक्ष्म गोष्टींकडे लक्ष देण्याची क्षमता महिलांमध्ये नैसर्गिकरित्या असते. त्यामुळे वास्तुकला, इंटिरिअर डिझाइन, वास्तु सल्लागार अशा क्षेत्रांमध्ये त्या उत्तम काम करू शकतात. महिलांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून नवीन क्षेत्रांचा स्वीकार केला तर त्या निश्चितच यशस्वी होतील.



# स्त्रीशक्तीचा सन्मान करणारा दिवस



सुप्रिया आतकरे
केक आणि ब्युटी आर्टिस्ट

सुप्रिया आतकरे नावाने फोटो आज आपण आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहोत. हा दिवस स्त्रीशक्तीचा तिच्या कर्तृत्वाचा आणि संघर्षाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. एक उद्योजका म्हणून काम करताना मला नेहमी जाणवतं की, स्त्री ही केवळ घराची नाही तर समाजाच्या घडणीची आधारस्तंभ आहे.

कला ही माझ्यासाठी केवळ व्यवसाय नाही, तर ती माझी ओळख आणि माझा श्वास आहे. प्रत्येक डिझाइन, प्रत्येक निर्मिती ही मनापासून केलेली अभिव्यक्ती असते. उद्योजक होणं म्हणजे फक्त नफा कमावणं नव्हे, तर स्वतःचं स्वप्न धैर्याने उभं करणं होय. अनेक अडचणी, आव्हानं आली; पण चिकाटी, मेहनत आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे आज आर्टिस्ट या नावाला वेगळी ओळख मिळाली आहे. कला जिथे प्रामाणिक असते, तिथे यश आपोआप येतं. स्त्री संकटांमध्येही खंबीर उभी राहते आणि आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी सतत कार्यरत असते. सबलीकरणाची सुरुवात आत्म विश्वासातून होते.

# गल्लीपासून दिल्लीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास



चंदाताई तिवाडी
भारुडसम्राज्ञी

पंढरपूर म्हटले की भारुड क्षेत्रात सर्वांच्या ओठांवर आपोआप येणारे नाव म्हणजे भारुडसम्राज्ञी चंदा तिवाडी. आपल्या ठसकेबाज आवाजाने आणि हजरजबाबी शैलीने त्यांनी गल्लीपासून दिल्लीपर्यंत तसेच परदेशातही भारुडाच्या माध्यमातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. गेल्या ४० वर्षांपासून त्या आळंदी ते पंढरपूर अशी आषाढीची पायी वारी नियमितपणे करीत आहेत. भारुड गायनातून संतांच्या शिकवणीप्रमाणे सम



ाजातील वाईट प्रथा, परंपरा आणि मानवी स्वभावातील दोषांवर त्या विनोदी आणि प्रभावी शैलीत भाष्य करतात. त्यामुळे त्यांचे भारुड केवळ मनोरंजन न करता समाजप्रबोधनही घडवते. १६ ऑक्टोबर १९४९ रोजी पंढरपूर येथे त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच नकला करण्याची त्यांना आवड होती. सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी भारुड गायनाचा प्रवास सुरू केला. टीबीसारख्या गंभीर आजारावर मात करत त्यांनी पुन्हा नव्या जोमाने कार्य सुरू ठेवले. चंदाताई केवळ कलावंत नसून सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रपती भवनातही त्यांच्या भारुडाचा कार्यक्रम झाला होता. समाजातील अंधश्रद्धा, स्त्रियांवरील अत्याचार, जातीयवाद आणि स्वच्छतेबाबत जागृती करण्यासाठी कलाकार पुढे यावेत, असे त्या आवर्जून सांगतात. त्यांच्या मते, समाजप्रबोधनासाठी देशभरात अनेक चंदाताई निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

# सर्वात जास्त काळ नगराध्यक्षपदावर विराजमान




साधना भोसले
नगराध्यक्ष

पंढरपूर नगरपालिकेमध्ये नगराध्यक्षपद भूषविलेल्या आत्ता पर्यंतच्या महिलांमध्ये सर्वात जास्तकाळ नगराध्यक्ष पदावर राहण्याचा मान माजी नगराध्यक्षा साधना भोसले यांना मिळाला आहे. तब्बल एक नाही, दोन नाही तर सलग साडेसात वर्षे साधना भोसले या नगराध्यक्षपदावर कार्यरत राहिल्या आहेत. त्या अगोदर सुनीता साळुंखे यांनी २००१ ते २००६ असे पाच वर्षे सलग नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. पालिकेच्या स्थापने पासूनच्या इतिहासात १९९७ मध्ये पहिल्या महिला नगराध्यक्षा होण्याचा बहुमान राजश्री प्रताप गंगेकर यांना मिळाला होता. त्यानंतर सलग साडेसात वर्षे नगराध्यक्षपदाची धुरा सांभाळणाऱ्या पहिल्याच रणरागिणी म्हणून साधनाताईंना बहुमान प्राप्त झाला आहे.

साधना भोसले या नगराध्यक्षपदी असताना त्यांनी घरामध्ये कधीही पालिकेचा शिपाई कामासाठी ठेवून घेतला नाही. कोणीही त्यांना भेटावयाला आले तर नगराध्यक्ष म्हणून त्यांनी कधीही रुबाब मिरविला नाही. साधना भोसले या स्वतः घरी भेटावयाला आलेल्या प्रत्येकाची जातीने विचारपूस करुन त्यांना चहा, पाणी देण्याचे काम त्या स्वतः करीत असत. त्यांनी पालिकेची गाडी देखील खासगी कामासाठी कधीही वापरली नाही. अत्यंत साधी राहणी, जेष्ठांचा मान, सन्मान ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्टे सर्वश्रुत आहेत. नगराध्यक्षपद आज आहे ते उद्या नसेलही पण साधना भोसले म्हणून माझी ओळख कायमच लोकांमध्ये माझ्या कामाने, माझ्या वागण्याने राहिली पाहिजे या भावनेतून सर्वसामान्यांसाठी त्या कार्यरत असत.




# पोलीस दलात गगनभरारी



अनिसा शेख
पोलीस

ग्रामीण भागातील मानसिकता आणि समाजातील बंधने झुगारून पोलीस दलात कर्तृत्व गाजवणाऱ्या वळसंग पोलीस ठाण्यातील हवालदार अनिसा जब्बार शेख यांची यशोगाथा थक्क करणारी आहे. मोहोळ तालुक्यातील शिरापूर येथील अनिसा यांना खेळाची आवड होती. दयानंद महाविद्यालयात पहाटे ५ वाजल्यापासून मैदानी सराव आणि अभ्यासाच्या जोरावर त्यांनी पहिल्याच प्रयत्नात पोलीस दलात प्रवेश मिळवला. वळसंग मध्ये पशुवैद्यकीय क्षेत्रात काम करून निवृत्त झालेल्या वडिलांचे साथ यामुळे पहिल्याच प्रयत्नात २०१० मध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून त्यांची नेमणूक झाली. मुस्लिम समाजात मुलींनी बुरख्यात राहावे, असा दबाव असतानाही माझ्या वडिलांनी मला खंबीर पाठिंबा दिला, असे त्या अभिमानाने सांगतात. सध्या त्या मुद्देमाल कारकून म्हणून कार्यरत असून, त्यांच्या क्यूआर कोड प्रणालीच्या नाविन्यपूर्ण प्रयोगाचे पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनीही कौतुक केले आहे. मोबाईलच्या जगात मर्यादा ओळखून महिलांनी यशाचे शिखर गाठावे, असा संदेश त्यांनी महिला दिनानिमित्त दिला आहे.

# महिलांकडून समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य



रेखा सिंह,
संभाजीनगर

असममधील तेजपूर येथे जन्मलेल्या रेखा सिंह या मेमरी टेक्निक्स क्षेत्रातील नावाजलेल्या प्रशिक्षक आहेत. त्यांच्या वडिलांची भारतीय हवाई दलातील नोकरी असल्याने त्यांचे बालपण विविध शहरांत गेले. बेंगळुरू विद्यापीठातून बी.ए. आणि बी.एड. शिक्षण घेतल्यानंतर विवाहानंतर त्या छत्रपती संभाजीनगर येथे स्थायिक झाल्या. २००५ साली मेमरी गुरु डॉ. विश्वरूप रॉय चौधरी यांच्या प्रेरणेने त्यांनी मेमरी टेक्निक्सचे प्रशिक्षण घेतले आणि अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विद्यार्थ्यांनी विविध रेकॉर्ड्सही केले आहेत. रेखा सिंह स्वतः इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या मानकरी आहेत. शिक्षणाबरोबरच आरोग्य, समुपदेशन आणि सामाजिक कार्यातून त्यांनी समाजाला प्रेरणा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.




# 'गृह उद्योगा' ला सातासमुद्रापार नेले



शीतल तांबोळी
उद्योजिका, संभाजीनगर

बचत गटातून महिला स्वावलंबी संस्कार आणि जिद्दीच्या जोरावर शीतल तांबोळी यांनी 'तांबोळी गृह उद्योगा' ला सातासमुद्रापार नेले आहे. आई-वडील आणि सासरच्या भक्कम पाठिंब्यामुळे एम.ए. मराठी, योग आणि चित्रकलेतील डिप्लोमा पूर्ण करणाऱ्या शीतल यांनी सासूबाईंनी सुरू केलेल्या व्यवसायाला आधुनिक जोड दिली. पती शशांक तांबोळी परदेशात असतानाही त्यांनी घराची जबाबदारी सांभाळत लोणचे, मसाले आणि चटण्यांना 'ब्रँड' म्हणून ओळख मिळवून दिली. केवळ स्वतःची प्रगती न साधता, त्यांनी शेकडो बचतगटांतील महिलांना कार्यशाळांच्या माध्यमातून प्रशिक्षित करून स्वावलंबी बनवले. त्यांच्या या कलासंपन्न धडपडीमुळे तांबोळी उत्पादने आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर परदेशातही लोकप्रिय आहेत.








लक्ष्मी बदलापूरे
सामाजिक कार्यकर्त्या

आजच्या काळात प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपली कर्तबगारी सिद्ध केली आहे. शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा तसेच समाजकार्यात महिलांचा सक्रिय सहभाग वाढत आहे. महिलांना उच्च शिक्षण मिळाले की केवळ एक व्यक्तीच नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाज प्रगत होतो.

शिक्षित महिला घरातील निर्णयांमध्ये सहभागी होऊन कुटुंबाची आर्थिक व सामाजिक उन्नती घडवतात. समाजकार्य करताना दुसऱ्यांच्या अडचणी सोडवण्यात आणि त्यांच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यात महिलांना विशेष समाधान मिळते. अनेक महिला आज समाजातील विविध प्रश्नांवर काम करत आहेत. विशेषतः स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार देण्याची क्षमता महिलांमध्ये अधिक असते. महिलांना संधी, शिक्षण आणि सन्मान मिळाला तर त्या नक्कीच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात.

# 'तिला' समजून घेऊया...


निमित्त
**समिधा पाठक**

मन विचार करून पार गोंधळलं होतं. काही केल्या त्याला त्याच्या प्रश्नाचं उत्तर मिळत नव्हतं. मग मनानं हृदयाला विचारलं- फार विचार केला रे, पण तरी ही स्त्री म्हणजे काय ? याचं मला उत्तर नाही मिळालं. तुझ्याकडे आहे का रे या प्रश्नाचं उत्तर? हृदयाने स्मित हास्य करीत उत्तर दिलं- रे मना, तुला उत्तर मिळणं कठीणच आहे, कारण तू बुद्धीने विचार केला, पण माझ्याकडे तुझ्या प्रश्नाचं उत्तर आहे. कारण, मी प्रेमाने विचार केलाय्, की- स्त्री म्हणजे नक्की काय आणि मला सहजच उलगडलं, की- स्त्री म्हणजे प्रेमाचं शाश्वत अस्तित्व! खरोखरंच, स्त्री म्हणजे विधात्यानी निर्माण केलेली सर्वात सुंदर प्रतिकृती! स्त्री म्हणजे- करुणा, माया व ममता यांचे सुंदर शिल्प! जे कोरून झाल्यावर देव समाधानानं हसला. त्याच्या हसण्यानं ते शिल्प जिवंत झालं व जग त्याला स्त्री म्हणून ओळखू लागलं! 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' म्हणत प्रत्येक मनुष्याला सर्वाधिक प्रिय असणारा व्यक्तिस्वातंत्र्यापासूनही आपण तिला दूर ठेवलं आणि तिची रक्षा करणाऱ्या पुरुषांनी कधी तिला जुगारात पणाला लावलं, तर कधी अग्निपरीक्षेला सामोरे जायला लावलं. मुलगी म्हणून ती जन्माला येते व घरातील खळाळतं अविरत संगीत बनते. पुढे भावाचा भरभक्कम आधार होते.

नात्यांपलीकडे जाऊन कोणाची जिवाभावाची मैत्रीण होते. अर्धांगिनी म्हणून आपल्या पतीच्या आयुष्याचं श्रद्धासु न बनते. अपेक्षांचं ओझं न मानता, संसाराचा रहाटगाडा ढकलण्याची जबाबदारी एक सून म्हणून स्वीकारते. संस्कारांचं बाळकडू पाजून लेकरांचं संगोपन करणारी माता होते व नातवंडांचे सारे हट्ट पुरविणारी लाडकी आजी होते. या सगळ्या प्रवासातील बदलांना स्वीकारताना तिचं कैकवेळा विस्कटणारं मन, अनेक वेळा नव्यानं उभारी घेतं व तिच्या को`जलेल्या फांदीला पुन्हा नव्यानं पालवी फुटत जाते. तिच्या साठवलेल्या स्वप्नांना गाठ मारून, तिच्या माणसांचे स्वप्न साकार करण्यासाठी आयुष्यभर झिजते. ज्या घरावर तिच्या नावाची पाटीही नसते, त्या घराला सजवण्यात ती आपलं उभं आयुष्य वेचते. सर्वांची लाडकी होताना, ती स्वतः ची मात्र कधीच होत नाही. तिच्या या सगळ्या प्रवासात आपण मात्र तिला 'टेकन फॉर ग्रँटेड' घेतो! तिची कामं, तिलाच जमतात आणि तिनंच ती करायला हवीत. तिने बिचारीने कितीही केलं, तरीही तिच्याकडून आपल्या अपेक्षापूर्तीचा आलेख नेहेमी उंचावतच असतो. आज तर स्त्रीला घराबाहेर पडून पुरुष्याच्या बरोबरीने अर्थार्जन करणे ही अपरिहार्य झालेले आहे. घरची व बाहेरची अशी दुहेरी जबाबदारी सांभाळताना तिची तारे वरची कसरत होत असते. स्त्री व पुरुष ही संसाररुपी रथाची दोन समान चाके आहेत. ज्या रस्त्यावर हा रथ चालवायचा, तो रस्ता काही नियतीने अगदी गुळगुळीत करून ठेवलेला नसतो. रस्त्यावर खाचाखळगे असणारच.

संसाराचेदेखिल तसेच आहे. परस्परांच्या सामंजस्यातून हा संसाररथ चालवावा लागतो. त्याकरिता दोघांनीही त्याग करायला हवा. केवळ स्त्रीला त्यागाची, सहनशीलतेची मूर्ती बनवू नये. घरातील सर्वांनीच तिला समजून घेतल्यास व घरकामात थोडा हातभार लावल्यास तिला थोडा आराम मिळू शकतो. तसेच तिला व्यवसाय किंवा नोकरीकरिता प्रोत्साहित करायला हवे. काही महत्त्वाच्या बाबतीत तिला स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास मोकळीक दिल्यास खऱ्या अर्थाने ती सुखी होईल. आपण देवीला शक्ती, बुद्धी, ऐश्वर्य, आरोग्य व समृद्धीची वरददायिनी मानतो.

भारतीय समाज नवरात्रीत दुर्गा देवीची पूजा करून साऱ्या जगाला स्त्री शक्तीचे महत्त्व सांगतो. 'या देवी सर्व भूतेषु मातृ रूपेण संस्थिताः' चे नाद ज्या गाभार्यातून निनादायचेत त्याच पवित्र गाभार्याला आज बालिकांचे आकांत चित्कार ऐकावे लागत आहेत. अंधारलेल्या रस्त्यांवरून चालताना अजूनही तिच्या हात पायांना कंप सुटतो. आज ट्रायल रूम्समध्ये कॅमेरे लावून एमएमएस बनवले जातात. माणसातली विकृती स्त्रीच्या डोळ्यातील स्वप्नं चिरडते. खेद तर या गोष्टीचा वाटतो, की- समाजात स्त्रीला अजूनही भोगवस्तू मानल्या जाते. तिची उपलब्धी करून घेण्यातच आजही समाजाला मोठे श्रेयस व धाडस वाटते. गैरप्रकार घडल्यास 'मुलीच्या जातीने एकटं का जावं?' म्हणत समाज स्त्रीला किंवा तिच्या पोशाखाला जबाबदार धरतो. समाजाच्या या मनोधारणेला खतपाणी घालणे योग्य नव्हे. लैंगिक दृष्टिकोनातून पाहिल्यास हे आढळून येतं, की समाजात एक वखवखलेला घटक आपण तयार केलेला आहे. बायकांवर आचरट विनोद रचणे हे भूषण मानल्या जातं. हा विषारी वैचारिक दृष्टिकोन बदलवणे, ही काळाची गरज आहे. स्त्रीमुक्ती अद्याप मिळवता आली नाही. विचारांची व परंपरांची शृंखला मोडणे म्हणजे खरी मुक्ती मिळवणे होय. स्त्री मुक्ती म्हणजे तिला स्वतः चे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचा हक्क प्राप्त करून देणे होय. तो तिला मिळवून द्यावा, यातच खरे पुरुषार्थ आहे. आजही अनेक घरांमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीचं दर्शन होतं. शहरां ध्ये आपल्याला दिसतंय्, कीस्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतेय्. आज अनेक सुशिक्षित स्त्रिया फक्त स्वतःपुरता किंवा आजूबाजूला ज्या स्त्रिया स्वतंत्रपणे वावरतांना दिसतात त्यांच्या पुरताच विचार करताना दिसतात पण ग्रामीण भागातील आपल्या भगिनींचा विचार करायला नको का?. स्त्रीभ्रूण हत्येचा आकडा कमी होत नाहीय् कारण वंशाला दिवाच हवा असतो. घरात बायकोला मारहाण केली जाते, नात्यातील लहान मुलींवर विनयभंगाचे अनेक प्रसंग घडतात. हे सगळं आज थांबवायला हवं. समाजातील सुशिक्षित घटक म्हणून हे आपलं आद्य कर्तव्य आहे. याची सुरुवात आपण आपल्या घरातूनच करू शकतो. आपल्याकडे काम करणाऱ्या ताईंची व त्यांच्या मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी आपण स्वीकारायला हवी. आज आठ मार्च! जागतिक महिला दिवस!! इतिहासाची पाने चाळलीत तर हे लक्षात येतं, की मुख्यतः मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी व स्त्री पुरुष समानता निर्माण करण्यासाठी यूरोपमधील महिलांनी आठ मार्च रोजी निषेध व्यक्त केला होता. त्यांचे अधिकार मिळेपर्यंत दरवर्षी आठ मार्चला किंवा मार्च महिन्याच्या पहिल्या रविवारी महिला आंदोलन करायच्या. थोड्याच वर्षांत त्यांना हे अधिकार बहाल करण्यात आले. पुढे १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने महिला शक्तीचा यथोचित गौरव व्हावा म्हणून आठ मार्च या दिवसाला आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून घोषित केले. आज वृत्तपत्रांच्या अनेक भागांत, स्त्रीशक्ती वर लेख वाचायला मिळतील. अनेक मंचांवरून नारीशक्तीचे गोडवे गायल्या जातील. कोठे स्त्रीमुक्तीचे महत्त्व पटविले जाईल तर कोठे स्त्री समानतेचे व स्त्री सबलीकरणाचे व्याख्यानं दिले जातील. 'परस्त्री मातेसमान,' 'बेटी धनाची पेटी' अशा आरोळ्या दिल्या जातील.



> गरज आहे, ती फक्त स्त्रीला सन्मान देण्याची. तिला समजून घेण्याची. तिच्या कामांची जाणीव ठेवण्याची व तिच्या विषयी मनात आदर बाळगण्याची. तो आदर मनात बाळगला, की- पुरुषाच्या विचारात व आचरणात आपोआप बदल होईल. मग रोजच महिला दिवस असेल.

महिलांचा सत्कार करण्यात येईल व पुन्हा जैसे थे! खरं तर या सगळ्याची गरज नाहीये. गरज आहे ती फक्त स्त्रीला सन्मान देण्याची. तिला समजून घेण्याची. तिच्या कामांची जाणीव ठेवण्याची व तिचा आदर मनात बनवायची! तो आदर मनात बनला, की विचारांत व आचरणात आपोआप येईल. मग रोजच महिला दिवस असेल. तिला कधी दमल्यावर पाण्याचा ग्लास जरी स्वतःहून दिला, एखाद्या दिवशी तिला आवडतो असा कडक चहा जरी केला किंवा आज तू दमली असशील असं म्हटल्यानेही तिचा थकवा दूर होतो. या छोट्या छोट्या गोष्टी तिला आनंदित करतात. तर मग तिला नेहमीच कॉम्प्रोमाईझ करायला न लावता, कधी तिला ही खूश करत जाऊया. आपल्या आयुष्यातील प्रत्येक परिस्थितीवर खंबीरपणे लढण्याची हिंमत देणाऱ्या व हृदयात वात्सल्य, पावित्र्य आणि मांगल्याचा त्रिवेणी संगम असणाऱ्या, प्रत्येक स्त्रीला महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# शेतकरी कन्या ते आदर्श शिक्षिका





आशा वाले
शिक्षिका,
जि.प.प्रा. कन्नड शाळा, तीर्थ

अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आशा बसवण्णप्पा वाले यांचा जीवनप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. आठ बहिणी आणि एक भाऊ अशा मोठ्या कुटुंबात वाढताना, ग्रामीण भागातील मर्यादांवर मात करत त्यांनी शिक्षणाचे ध्येय गाठले. जगाला अन्न देणाऱ्या अन्नदात्याची मी राजकन्या आहे, असा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या आशाताईंनी प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या या यशात प्राथमिक शिक्षक विद्याधर गुरव गुरुजींचे संस्कार आणि मामा बाबुराव कोतले यांचे पाठबळ मोलाचे ठरले. गावातील पहिली महिला शिक्षिका होण्याचा मान त्यांनी मिळवला. २००९ पासून जत आणि वळसंग येथील कन्नड शाळांमध्ये सेवा बजावल्यानंतर सध्या त्या दक्षिण सोलापूरमधील तीर्थ येथे विषय शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना 'राजमाता आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. मुलींनी स्वत्व आणि पालकांचा स्वाभिमान जपत मर्यादेत राहून प्रगती करावी, असा संदेश त्या देतात. महिला दिनानिमित्त एका ध्येयवेड्या शिक्षिकेचा हा प्रवास समाजातील इतर मुलींसाठी नक्कीच दीपस्तंभ ठरेल.






# महिलांनी आत्मनिर्भर बनावे



अंबिका पाटील,
अध्यक्षा, स्वप्नपूर्ती महिला सामाजिक संस्था

बचतगटांच्या माध्यमातून महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास आणि सामाजिक जाणीव निर्माण होत आहे. होटगी येथील स्वप्नपूर्ती महिला सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अध्यक्षा अंबिका पाटील शिक्षित तसेच अल्पशिक्षित महिलांना लघु व गृहउद्योगाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य करत आहेत. महिलांनी महिलांसाठी स्थापन केलेली ही संस्था गेल्या सहा वर्षांपासून महिला रोजगार, आरोग्य, हक्क-अधिकार आणि पर्यावरण या विषयांवर सातत्याने काम करत आहे. महिलांना घरबसल्या रोजगार मिळावा यासाठी उन्हाळी पदार्थ, दिवाळी फराळ, विणकाम व शोभेच्या वस्तू तयार करून त्यांची विक्री करण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. तसेच गारमेंट व गृहउद्योगातून स्कूल युनिफॉर्म, मास्क, होजिअरी कपड्यांचे उत्पादन केले जाते. आतापर्यंत सुमारे ६०० महिलांना रोजगार मिळवून देण्यात यश आले आहे. -

# संघर्षावर मात करण्याची ताकद महिलांमध्ये



साधना शहाणे
संभाजीनगर

साधना शहाणे यांच्या आयुष्यात आई व प्राचार्य वडिलांच्या क्रीडाक्षेत्राचीही आवड होती. त्यांचा यांच्याशी झाला. मात्र वडील, आयुष्यात मोठे संकट आले. दोन स्वयंपाकाच्या आवडीचे रूपांतर डबे व केटरिंग व्यवसायातून त्यांनी पोषण आहाराचे कामही आज देशाबरोबर त्यांनी अनेक उदाहरण आहे.

अनेक दुःखद प्रसंग आले. शिक्षिका संस्कारात वाढलेल्या साधनाताईंना विवाह पोलीस निरीक्षक राजेंद्र शहाणे पती आणि मुलाच्या निधनाने त्यांच्या मुलींना सांभाळत त्यांनी खचून न जाता व्यवसायात केले. फराळाचे पदार्थ, स्वतःला उभे केले. पहाटे उठून शालेय केले. त्यांच्या चविष्ट पदार्थांची मागणी परदेशातही आहे. संघर्षावर मात करत महिलांसाठी प्रेरणादायी निर्माण केले




## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले



सावित्रीबाईंनी
ज्ञानगंगा पसरवली
स्त्रीशक्तीला
जगण्याची दिशा दाखविली
संकटांचा भार स्वतः खांद्यावरती घेतला
मुलींसाठी शाळा पहिली पुण्यात काढली
सावित्रीबाईंनी ज्ञानगंगा पसरवली
शेण, दगडाची पर्वा नाही केली
महिलांना मानसन्मान मिळवून दिला
ती महा नारीशक्ती भारत देशवाली
सावित्रीबाईंनी ज्ञानगंगा पसरवली

भारत देशातील महिला आज
चंद्रावरती पोहोचली सरस्वतीच्या रूपात
माई आम्हाला मिळाली
आज साऱ्या महिला स्वाभिमानाने
जीवन जगू लागल्या
सावित्रीबाईंनी ज्ञानगंगा पसरवली
आजची मुलगी शिकून वकील, पंतप्रधान,
राष्ट्रपती झाली हे श्रेय जाते
फुले दाम्पत्याला म्हणूनच आज त्यांच्यामुळे
दोन शब्द लिहायला शिकली...

संगीता संतोष ठलाल

# 'अस्मिता'च्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण



गीता आचार्य
संभाजीनगर

वंध्यत्वाच्या समस्यांनी त्रस्त दाम्पत्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने गीता आचार्य यांनी वेगळ्या क्षेत्रात कार्य सुरू केले. विज्ञान शाखेत पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पती अनिरुद्ध आचार्य यांच्या सहकार्याने वीर्य तपासणीसाठी 'शुक्रतारा' हे उपकरण तयार केले तसेच स्पर्म बँक आणि प्रयोगशाळा सुरू केली. कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या नमुन्यांचे जतन करण्याची सुविधाही त्यांनी उपलब्ध करून दिली. 'एव्होल्युशन व्हिजन' कंपनीच्या माध्यमातून गरीब रुग्णांना मोफत उपचार दिले जातात. 'अस्मिता फाउंडेशन' आणि इतर उपक्रमांद्वारे महिलांचे सक्षमीकरण व सामाजिक कार्यही त्यांनी केले. समाजासाठी समर्पित अशा गीता आचार्य यांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे. गीता आचार्य यांनी अस्मिता फाउंडेशन या फाउंडेशनची स्थापना करून महिलांना सक्षम केले. कोविड चालू असताना गरज ओळखून श्रीवर्धन फाउंडेशन तर्फे गरजू लोकांना किराणा वाटप धान्य वाटप करून जवळपास ३००० हून अधिक लोकांना दर महिन्याला त्यांनी त्यांच्या हॉस्पिटलच्या माध्यमातून विनामूल्य मदत केली.





राणी आसबे
मंगळवेढा रोड, सांगोला

# स्त्रीमध्ये संघर्षातून यशाकडे जाण्याची ताकद



पती हा कुटुंबाचा, विशेषतः पत्नीचा जोडीदार आणि आधारस्तंभ असतो. आधुनिक काळात पती केवळ पोशिंदा नसून, तो एक मित्र, विश्वासू आणि एक सहकारी म्हणून भूमिका बजावत असतो. परंतु पतीचे अपघातात अचानक निधन होणे ही आयुष्यातील सर्वात कठीण, धक्कादायक आणि भावनीक कोसळणारी वेळ असते. याच आलेल्या प्रसंगाचा सामना करत सांगोल्यातील राणी आसबे या आपल्या मुलांना घडवत आहेत. आई-वडील व शहरातील माता बालक प्रतिष्ठानच्या संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर यांनी दिलेल्या आधारावर त्यांनी आपल्या मोठ्या मुलीला फॅशन डिझायनर केले असून ती सध्या गुजरात येथे एका मोठ्या कंपनीत कार्यरत आहे. तसेच अकरावीत शिकणाऱ्या मुलाला इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर व सातवीत शिकणाऱ्या मुलीला अधिकारी होण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्या धडपडत आहेत.

पतीच्या निधनानंतर आधार देणारे वडील पण यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले असून स्वतःच्या कुटुंबासह माहेरचे पण कुटुंब त्या सांभाळत आहेत.


# मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवणाऱ्या : राधा बजाज



राधा बजाज
संभाजीनगर



आजच्या स्पर्धात्मक काळात मुलांवर अभ्यासाचा ताण वाढत असून त्यांच्या एकाग्रतेवर व आत्मविश्वासावर त्याचा परिणाम होताना दिसतो. ही गरज ओळखून राधा संजीव बजाज आणि संजीव बजाज यांनी छत्रपती संभाजीनगर येथे सुमारे दोन दशकांपूर्वी मास्टर माईंड अबॅकस संस्थेची स्थापना केली. राधा बजाज या पोस्ट ग्रॅज्युएट असून शिक्षणाबद्दल त्यांना विशेष आवड आहे. अबॅकसच्या माध्यमातून मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती, गणितातील आवड आणि बौद्धिक क्षमता वाढवण्याचे कार्य त्या करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत केली असून शंभरहून अधिक महिलांना अबॅकसचे प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. मुलांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे.




## स्त्री- तुझीच तुला ओळख

मनसोक्त हास्याचा एक दिवस निरभ्र आकाशात भरारी नि गार वाऱ्यात झोपाळ्यावर झोके घेण्याचा आनंदी एक दिवस बघ! खूप साधे आहे जमेल का संसाराच्या रहाटगाडग्यात तुला...?

उगाच मैत्रिणींच्या घोळक्यात उभे तासन्तास जुन्या आठवणींचे हरवलेले क्षण मिळवणे किंबहुना सागरी किनाऱ्यावर जलद गतीने धावण्याची शर्यत बघ! खूप साधे आहे जमेल का घरच्यांचा वेळा सांभाळताना तुला...?

कधीतरी फुलपाखरूसारखं उंच भरारी घेत उडायचे समुद्रावर नि सूर्याला पाण्याच्या प्रतिबिंबात पकडण्याची कसरत मुक्तपणे बघ! खूप साधे आहे जमेल का मुलांचा सांभाळ करताना तुला...?

पावसात चिंब चिंब होऊन उगाच चिखलात माखणे इंद्रधनुष्याचे रंग स्वतःवर उधळत चातकासारखी उन्मुक्त हो

बघ! खूप साधे आहे जमेल का तुझीच स्वतःची ओळख देताना तुला...?

प्रा. श्वेता येणोरकर

# सज्जनांचे मौन : एक दाहक वास्तव

**८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा होतो आहे. त्या दिवशी आपण स्त्रीशक्तीचा गौरव करतो, तिच्या कर्तृत्वाचा सन्मान करतो. तिचे अभिनंदन करून मोकळे होतो. परंतु तिचा खरा सन्मान केवळ अभिनंदनाच्या संदेशांत नाही. तो त्या वेळी सिद्ध होतो, जेव्हा अन्यायाच्या प्रसंगी समाजातील सज्जन लोक धैर्याने उभे राहतात. असे जेव्हा होईल तेव्हाच स्त्रीला आपण सुरक्षित असल्याचा विश्वास निर्माण होऊ शकेल. एक व्यक्ती म्हणून तिला तिचे अधिकार देणे ही त्या पुढची पायरी आहे.**

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२


परवा टीव्हीवर महाभारतातला द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग पाहत होतो. हा प्रसंग अनेक वेळा पाहिलेला असला तरी प्रत्येक वेळी तो मनाला नव्याने अस्वस्थ करून जातो. खरे तर हा प्रसंग इतका हृदयविदीर्ण करणारा आहे की तो पाहवत नाही. भर दरबारात उभ्या असलेल्या द्रौपदीचा आक्रोश, तिने लज्जा रक्षणासाठी केलेली धडपड, तिचाआकांत, तिच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू आणि तिची असहाय्यता पहावत नाही.

पण त्या प्रसंगात सर्वात जास्त अस्वस्थ करणारी गोष्ट कोणती आहे हे माहिती आहे का? तर ती आहे सभेत बसलेली महान पराक्रमी अशी धुरंधर मंडळी. पितामह भीष्म, आचार्य द्रोण, कृपाचार्य, विदुर यांसारखे धर्मनिष्ठ आणि विद्वान मानले जाणारे लोक त्या दरबारात उपस्थित असतात. पण त्या वेळी ही सगळी मंडळी आपल्या तोंडात जणू मिठाची गुळणी धरून असतात. अन्याय डोळ्यांसमोर घडत असताना ते हातावर हात धरून शांत बसलेले दिसतात. त्यांची हतबलता पहावत नाही.

त्याशिवाय ज्यांनी अशा प्रसंगी उसळून उभे राहावे असे द्रौपदीचे पराक्रमी म्हणून ओळखले जाणारे पाच पतीदेखील त्या वेळी असहाय्य होऊन बसलेले असतात. त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या पत्नीचा अपमान होत असताना ते हात चोळत बसण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. ज्यावेळी आपल्या पत्नीच्या पदराला कोणी हात घालते आहे अशा वेळी राजशिष्टाचार, द्युताचे नियम इत्यादी सगळ्या गोष्टी बाजूला सारून भीम, अर्जुन यांच्यासारखी धुरंदर मंडळी उभी राहिली असती तर पुढील महाभारत कदाचित घडले नसते. शेवटी द्रौपदीचा कृष्ण सखा मदतीला धावतो.

हे सगळे पाहून अस्वस्थ व्हायला होते. ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने गीता फक्त अर्जुनाला सांगितली नाही. अर्जुन हा निमित्त आहे परंतु गीतेचा उपदेश हा सर्वांसाठी आहे. त्याचप्रमाणे मला असे वाटते की हा द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग केवळ द्रौपदी पुरता मर्यादित राहत नाही द्रौपदी ही प्रातिनिधिक आहे. ती केवळ ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिरेखा म्हणून सोडून देता येणार नाही. ती जगातील सगळ्या स्त्रियांची प्रतिनिधी आहे. दुर्योधनादि कौरव सोडले तर दरबारात बसलेली सगळी मंडळी म्हणजे सज्जन मंडळी आहेत असे म्हणूया. हे तथाकथित सज्जन देखील सार्वकालिक सज्जनांचे प्रतिनिधी आहेत असे मला वाटते आणि अशा सज्जनांचे मौन किंवा त्यांची निष्क्रियता समाजासाठी किती घातक आहे याचे हे इतिहासाने दिलेले तेव्हापासूनचे उदाहरण आहे. द्रौपदी वस्त्रहरणाचा महाभारतातील हा प्रसंग केवळ एका स्त्रीच्या अपमानाची कथा नाही, तो समाजातील सज्जनांच्या निष्क्रियतेचा आरसा आहे. अन्याय करणारा दुर्जन नक्कीच दोषी असतो; पण त्याच्याइतकाच दोष त्या सज्जनांचाही असतो, जे आपल्या डोळ्यासमोरअन्याय घडत असताना शांत बसलेले दिसतात. अशावेळी त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा, त्यांच्या पराक्रमाचा काय उपयोग ! त्यांचे शिक्षण व्यर्थच म्हणायचे !

आता आपल्या लज्जा रक्षणासाठी कोणी येणार नाही हे जेव्हा द्रौपदीला लक्षात आले, तेव्हा तिने अनन्य स्वराने श्रीकृष्णाचा धावा केला. त्याला आर्त हाक मारली. द्रौपदीचा हा सखा त्या हाकेला प्रतिसाद देत धावून आला आणि त्याने तिची लाज वाचवली. तिच्या साडीचे अंतहीन वस्त्र झाले. तिचे वस्त्र ओढणारे हात थकून जमिनीवर पडले आणि भर दरबारात तिचे जे वस्त्रहरण होणार होते ते टळले. त्या प्रसंगी संकटाच्या क्षणी श्रीकृष्ण धावून आले. आजही ते तसेच येतील का ? त्यांची वाट पाहायची का ? आजच्या काळात तसे होणे शक्य आहे का ? आजच्या या काळात कोणा अबलेच्या आर्त हाका ऐकून श्रीकृष्ण धावून येतील आणि तिची दुष्टांच्या तावडीतून सुटका करतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. आजची परिस्थिती वेगळी आहे. आज प्रत्येक सज्जन माणसालाच स्वतःमध्ये कृष्ण जागवावा लागेल. आपण भगवद्गीता वाचतो. अनेकदा तिचे पारायणही करतो. तिच्या श्लोकांचा आदर करतो. पण गीतेचा संदेश केवळ वाचण्यासाठी नाही; तो आचरणात आणण्यासाठी आहे. अन्यायासमोर उभे ठाकणे, दुर्बलांच्या पाठीशी उभे राहणे आणि अधर्माला विरोध करणे हाच गीतेचा खरा अर्थ आहे. आपल्या कर्तव्यापासून च्युत झालेल्या अर्जुनाला कर्मप्रवृत्त करणे हाच गीतेचा उद्देश होता आपल्याला देखील गीता कर्म प्रवण करते. समाजात अनेक ठिकाणी स्त्रियांवर वेळोवेळी अन्याय होतो. कधी घराच्या चार भिंतीत, कधी भर रस्त्यावर, तर कधी तिच्या कार्यक्षेत्रात. अशा वेळी अनेकदा सभोवताली उभे असलेले ( सज्जन ) लोक गप्प राहणे पसंत करतात. सत्तेची भीती, पैशाचा मोह किंवा स्वतःच्या सुरक्षिततेची चिंता या कारणांमुळे सज्जन लोक मौन बाळगतात. पण इतिहास सांगतो की समाजाचे सर्वांत मोठे नुकसान दुर्जनांच्या शक्तीने होत नाही; ते सज्जनांच्या मौनामुळे होते. लोकशाहीत जेव्हा निवडणुका होतात, तेव्हाही बऱ्याचदा सज्जनशक्ती मौन राहते त्यामुळेच नको असलेल्या व्यक्ती सत्तेवर येण्याचा धोका असतो. वर उल्लेख केलेला महाभारतातील प्रसंग आपल्याला सांगतो की सज्जनांचे मौन हेही अनेकदा अधर्माला बळ देणारे असते. आजच्या काळात श्रीकृष्ण प्रत्यक्ष येणार नाहीत. कारण त्यांनी गीतेच्या माध्यमातून विवेकाची ज्योत आपल्या हातात दिली आहे. आता सज्जनशक्ती हीच कृष्णशक्ती व्हावी ही काळाची गरज आहे. कदाचित स्त्रीसन्मानाचा खरा उत्सव तेव्हाच साजरा होईल, जेव्हा समाजातील सज्जनांचे मौन तुटेल.



# महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा



संगीता देशपांडे
संभाजीनगर

बालपणी जोपासलेले छंद आयुष्यभर जपले तर त्यातून सुंदर कलाकृती निर्माण होतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे संगीता देशपांडे. मूळच्या अहमदनगरच्या असलेल्या संगीता विवाहानंतर गुजरातमधील वापी येथे स्थायिक झाल्या. लहानपणापासूनच त्यांना विविध कलांची आवड होती. सासूबाई प्रतिभा देशपांडे आणि पती किरण देशपांडे यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांच्या कलागुणांना अधिक वाव मिळाला. कॅनव्हास, ऑइल, ग्लास, फॅब्रिक अशा विविध प्रकारच्या पेंटिंगसह सुंदर रांगोळ्या, सॉफ्ट टॉईज, आकाशदिवे, ग्रीटिंग कार्ड, जरदोई वर्क, दागिने बनवणे अशा अनेक कलांमध्ये त्या पारंगत आहेत. त्यांच्या हस्तकला आणि गृहसजावटीच्या वस्तूंना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. कलागुणांनी समृद्ध अशा संगीता देशपांडे या खऱ्या अर्थाने बहुगुणी कलावंत आहेत.

# महिलांचा मान देशाचा सन्मान





कविता हिंगमिरे
जि. प. शाळा सुमित्रा नगर,
(ता. माळशिरस जिल्हा सोलापूर)

मी कविता धन्यकुमार हिंगमिरे जि प शाळा सुमित्रा नगर तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर. ८ मार्च जागतिक महिला दिननिमित्त तुम च्याशी, महिलांशी थोडे हितगुज साधावेसे वाटते. माझ्या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे माझ्या शाळेतही महिला राज आहे.आम्ही दोघी आणि भात शिजवणाऱ्या काकी अशा तीन जणी आणि अंगणवाडीच्या दोघी म दतनीस आणि सेविका एका हाताच्या पाच बोटाप्रमाणे असणाऱ्या आम्हा बायकांची एक वज्रमूठ आणि त्यामुळेच आम्ही अशक्य ते शक्य करून दाखवले आहे. शाळेचा नावलौकिक आज निर्माण झालेला आहे. ठरवलं तर महिला खूप काही करू शकतात याची प्रचिती आमच्या शाळेकडे बघितल्यावर सर्वांना येते. न्यूयॉर्क येथील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक काम गिरीच्या स्मरणार्थ ८ मार्च जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. भारतात ८ मार्च १९४३ रोजी मुंबई येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला. १९९७ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या सम स्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या आणि स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली.

स्त्री शिवाय कुटुंब पूर्ण होऊ शकत नाही. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ती एक स्त्री, मुलगी, आई, पत्नी, प्रेयसी मैत्रीण अशा विविध भूमिका जबाबदारीने पार पाडत असते. पण स्त्रीने एक लक्षात ठेवले पाहिजे. 'तुझ्यासोबत चालण्याचे वचन दिले असेल मी, पण याचा अर्थ असा नाही की माझी वाट विसरली असेल मी.' या उक्तीप्रमाणे सर्व जबाबदाऱ्या सांभाळत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही महिलांना अनेक सम स्यांना सामोरे जावे लागत आहे. अंधश्रद्धा, लैंगिक अत्याचार, हुंडाबळी इत्यादीमुळे स्त्रियांचे जीवन सुरक्षित राहिले नाही. या सर्व समस्यांची निर्मूलन करून स्त्री पुरुष समानता समाजात आचरणात आणायला हवी. स्त्रीने स्वतः आत्मनिर्भर बनून स्वतः चे कार्यक्षेत्र विस्तारले पाहिजे व समाजाने यासाठी तिला प्रोत्साहन दिले पाहिजे. म्हणूनच महिला दिनाच्या निमित्ताने शेवटी असे म्हणावेसे वाटते की,

मी सुद्धा स्पर्श करू शकते
आकाश, फक्त संधी मिळायचा आहे
अवकाश.

# स्त्री सक्षमीकरण: काळाची गरज



नर्मदा कनकी,
प्राथमिक शिक्षिका व
राज्यस्तरीय निबंधलेखिका

स्त्री सक्षमीकरण म्हणजे केवळ हक्क मिळवणे नव्हे, तर स्त्रियांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या निर्णय घेण्यास सक्षम करणे होय. आधुनिक काळातही हुंडाबळी आणि भेदभावासारख्या प्रथा अस्तित्वात असणे क्लेशदायक आहे. ही अन्यायाची साखळी तोडण्यासाठी महिलांना सुरक्षित वातावरण आणि समान संधी मिळणे आवश्यक आहे.

महिलांनी केवळ कुटुंबासाठी न जगता, स्वतःचे छंद आणि आवडी जोपासत स्वतःसाठीही जगायला हवे. जेव्हा एखादी स्त्री स्वतःचा विचार करते, तेव्हा तिचा आत्मविश्वास द्विगुणित होऊन ती खऱ्या अर्थाने 'आत्मनिर्भर' बनते. स्वतःच्या अस्तित्वाचा आणि आनंदाचा शोध घेणारी स्त्रीच पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरू शकते. चला तर मग, या महिला दिनानिमित्त स्वतःमधील आत्मविश्वास जागृत करूया आणि प्रगतीची नवी शिखरे सर करूया.

# स्त्रीशक्तीचा खरा जागर: उत्सवाकडून आत्मनिर्भराकडे



श्वेता शिंदे,
शिक्षिका

दरवर्षी ८ मार्चला महिला दिन उत्साहात साजरा होतो, पण संध्याकाळ झाली की तो उत्साह मावळतो. खऱ्या अर्थाने प्रगती साधायची असेल, तर महिलांनी 'मी कोण आहे?' आणि 'मी काय करू शकते?' याचा शोध घेतला पाहिजे. केवळ नोकरी करून स्वतःची प्रगती करण्यापेक्षा, उद्योग-व्यवसायाची कास धरून इतरांच्या हाताला काम देणे ही काळाची गरज आहे. 'डबक्याबाहेर पडल्याशिवाय सागर दिसत नाही', हे लक्षात घेऊन महिलांनी आर्थिक सक्षमतेसाठी नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महिलांनी एकमेकींचे पाय खेचण्यापेक्षा सहकार्य आणि सामंजस्याची भूमिका घ्यावी. हेवेदावे आणि अहंकार सोडून जेव्हा आपण एकमेकींच्या पाठीशी उभे राहू, तेव्हाच खऱ्या अर्थाने विकास होईल.

# स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी



निमित्त
डॉ. सुखदेव शिनगारे
सोलापूर.

असं म्हटलं जातं, पण माझ्या आईच्या बाबतीत बोलायचे झाले तर आईची जागा साक्षात परमेश्वर सुद्धा घेऊ शकत नाही हेच त्रिवार सत्य आहे. विश्वाचा जनिता म्हणे यशोदेसी माता - साक्षात सृष्टीच्या निम ताही यशोदेला आई म्हणून हाक मारतो , यातच मातृत्वाचे थोरपण सामावलेले आहे.

माझी आई, श्रीमती सुभद्रा दत्तू शिनगारे,तिला ना लिहिता येते, ना वाचता येते. शैक्षणिक दृष्टीने ती कदाचित 'अडाणी' असेल, पण व्यावहारिक ज्ञानाच्या बाबतीत मोठमोठे अर्थतज्ञही तिच्यासमोर फिके पडतील. मंडईमध्ये भाजी विकून तिने तीस एकराचे साम्राज्य उभे केले. मला डॉक्टर बनवले, माझ्या मोठ्या बंधूंच्या दोन्ही मुलांना डॉक्टर बनवले.

आजही मला फोन करायचा असेल, तर ती कागदावर लिहून दिलेला नंबर एखाद्या रिक्षावाल्याला दाखवते. त्याच्या फोनवरून मला संपर्क करते आणि मग मी त्या रिक्षावाल्याला पत्ता सांगून तिला घरी बोलावून घेतो. तिची ही निष्पाप धडपड पाहून आजही डोळे पाणावतात.

तिच्या या कष्टांची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. आजही तिला कपड्यांसाठी किंवा खर्चासाठी पैसे दिले, तर ती स्वतःसाठी एक पैसाही खर्च करत नाही. उलट, 'पणतवांना कानातलं काहीतरी घे, पायातलं काहीतरी घे' असं म्हणून ते पैसे त्यांच्यावरच ओवाळून टाकते. ही अशी 'आभाळमाया' शोधूनही सापडणार नाही. अशा थोर माऊलीच्या पोटी माझा जन्म झाला, हे मी माझे परमभाग्य समजतो. आई, तुझे उपकार या जन्मी तरी

# 'स्त्री'

स्त्री या दोन अक्षरांनी व्यापलेली सृष्टी जणु काही आपल्या रेषांनी रेखाटली अवनी जन्माला आल्यापासून अस्तित्व जपणारी ती स्त्री म्हणजे स्त्री असते...

किशोर अवस्थेत स्वतःला सावरणारी मान नावलौकिक करून आई-वडिलांची शान हिऱ्यांना पैलू पाडून संस्काराची खान असे संस्कार सौंदर्याची स्त्री म्हणजे स्त्री असते...

तारुण्याच्या जीवनाला भेडसावत सावित्रीच्या पायावर पाय ठेवत शिक्षणाचे धडे गिरवणारी कुठे तरी उंच क्षितिज गाठायची तयारी असणारी स्त्री म्हणजे स्त्री असते...

काट्याकुट्यांच्या मार्गावर भ्रमण करणारी स्वतःला सावरत अंधारातून वाट काढणारी तरी विश्वास न ढळता अंधार प्रकाशमय करणारी काट्यांना लपवून गुलाबाप्रमाणे सदैव हसणारी स्त्री म्हणजे स्त्री असते...

सुरवंटाची फुलपाखरू ही किमयास फक्त स्त्रीमुळे असते ती कोणाची मुलगी, बहीण, बायको, आई सर्वांना सांभाळत आपलेपणाची चाहुल लावणारी कठीण प्रसंगांना तोंड देणारी पक्ष्यांप्रमाणे आपल्या लेकरांची छाया तर कुटुंबावर माया स्त्री म्हणजे स्त्री असते...

या जगात स्त्री शिवाय नसेल आधार आयुष्याला सोसने सर्व परिस्थितीचा भार आपल्या हसतमुख सौंदर्याने खुलवते आयुष्य छान सर्वांनी क्षणोक्षणी 'स्त्री'ला द्यावा मान हिच इच्छा

श्रद्धा ओझरकर
(शेलुकर)

# कामगार झाली पापड उद्योगाची मालकीण



संपदा डोंगरे
उद्योजिका

सोलापुरातील लक्ष्मी पापड उद्योगात महिनाकाठी अवघ्या ८०० रूपयांवर काम करणाऱ्या संपदा लक्ष्मण डोंगरे यांनी जिद्दीने ४ महिलांना घेवून २०१३ साली लक्ष्मी विष्णू चाळीत पापड व्यवसाय सुरू केला आणि अवघ्या १३ वर्षातच तब्बल ५ हजार ८०० महिला आणि २६ पुरुष कर्मचाऱ्यांना रोजगार पुरवित त्या या व्यवसायातून कोट्यवधींच्या मालकीन झाल्या आहेत. सध्या संपदाताईंचा लक्ष्मी विष्णू चाळीत स्वतःचा 'महालक्ष्मी' महिला पापड उद्योग दिमागात सुरू असून, याचे पूर्ण काम त्यांचे चिरंजीव राजाभाऊ डोंगरे हे पाहत आहेत. या ठिकाणी प्रति महिन्याला १०० ते १२५ टन विविध प्रकारचा पापड निर्माण होवून यातील १०० टन पापड निर्यात केला जातो. सोलापुरी महिलांनी निर्माण केलेल्या पापडला विदेशात मागणी वाढली असून, अजून ५० टनाची मागणी असल्याचे त्यांनी स्वाभिमानाने सांगितले. याचबरोबर आपल्या देशातील हॉटेल ताजसारख्या इतरही मोठ्या हॉटेल्समध्ये आणि डी मार्ट मध्येही त्यांच्या सोलापुरी पापडने मार्केट मिळविले आहे. एकंदरीत, कोणत्याही कामाचा ध्यास घेतला की ध्येय साध्य होते...हेच संपदा डोंगरे यांचे मोठे उदाहरण आहे.



# 'ती'ची कविता

निमित्त
वृंदा जोगळेकर




"आई, तुला काय समजतं?'' सोहम् सतत आईला असं विचारत असतो. त्याला वाटतं, की- आईला काय काम असतं? दिवसभर ती घरी असते. 'अगंबाई सासूबाई!' सिरियलमध्ये आपल्याला भेटणाऱ्या सोहम्‌ला वय वाढलं तरीही त्याच्या आईची धडपड कधी दिसलीच नाही. 'इंग्लिशविंग्लिश' सिनेतून, बायकोला इंग्रजी येत नाही म्हणजे तिला काहीच व्यवहार समजत नाही, असा विचार करणारा नवरा आपल्याला भेटला.

अशी मुलं आणि नवरे अजूनही आपल्याला आजूबाजूच्या घरांत दिसतात. लहान असताना आम्हीही आईला म्हणायचो- "आई, तुला शाळेत जावं लागत नाही, अभ्यास नाही आणि मुख्य म्हणजे परीक्षा नाही. तुझी तर मज्जाच आहे नुसती!'' आई नुसतंच गोड हसायची. तिनं कधी म्हटलं नाही, की- "तू मोठी झाली ना की मग तुला कळेल की!'' पत्नी आणि आई होणं म्हणजे प्रत्येक क्षण परीक्षा असते, हे आता समजतं. निरक्षर असलेल्या पण काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा असलेल्या बहिणाबाईंनी शेतकाम आणि घरकाम करत असताना उत्स्फूर्तपणे ओव्या रचल्या आणि त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्या म्हणतात- अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर, आधी हाताला चटके, तेव्हां मियते भाकर' तर 'वाटच्या वाटसरा' या कवितेतून बहिणाबाई सांगतात, की- संसाराची वाट काही सरळसोट नाही. ही काटेरी, दगडधोंड्यांची वाट पायाला फोड आले तरी चालावी लागेल. सुख-दुःखाचे उतार-चढाव, खरी-खोटी मायेची माणसं, संकटांचे वादळवारे यांचा सामना करीत धीरानं हा रस्ता पार करावा लागेल. शांता शेळकेंची 'खांब' ही कविता तर स्त्रीचं संपूर्ण आयुष्यच रेखाटते.

सामान्य स्त्रीसाठी तिचा परिवार म्हणजे तिचं विश्व. आजही तिचा पती, तिची मुलं म्हणजे तिचा श्वास! त्यामुळे त्यांच्यासाठी कष्ट उपसताना ती थकत नाही. ती, तिच्या घराचा जमीनीत खोलवर रुतलेला खंबीर खांब होते अन् सारं घर त्यावर तोलते. खांब - शांता शेळके बाईच्या ओठांआड दडलेले असते रडणे वर वर हसणे आणि आतल्या आत कुढणे ! आल्यागेल्यांचा सत्कार बाई स्वतः करते घरभर वारे होऊन ती सतत फिरते नवरा, मुले, सासू, सासरे, तिलाच साद देतात रात्रंदिवस तिचे कष्ट विनामोबदला घेतात आजाऱ्याच्या उशापाशी दिवा होऊन जागते भल्या पहाटे उठून पुन्हा बाई कामाला लागते रांधा, वाढा, उष्टी काढा कपाळावर गोंदण राबण्याचा गाव तिला लग्नात मिळाला आंदण! गोंदणावर खुलत असतो सूर्य लाल टिळा चार काळ्या मण्यांनीच साजरा दिसतो गळा तिच्या अहेवचुड्याआड मनगट असते घट्ट सारे मीच करीन ! तिचा जन्मताच हट्ट ! कुशीत भार वाहून देते वंशसाठी दिवा पुढल्या अनेक पिढ्यांसाठी तीच जुळवते दुवा भुईत पाय रुजवून बाई आभाळभर फुलते देहाचाच खांब करून अवघे घर तोलते ! 'चूल आणि मूल' या विश्वातून स्त्री पुढे आली आणि मग नोकरी करू लागली. आता केवळ घरची गृहिणी न रहाता ती तिचं क्षेत्र विस्तारलं. घरात एक आणि घराबाहेर दुसरी अशा दोन वेगळ्या भूमिका ती पेलते आहे. तरीही तिच्या घरातील गोष्टींशी तिचं नातं जुळलेलं आहे. नोकरीवरून दमून घरी परतल्यावर त्या घरातील सगळ्या सजीव-निर्जीव मुक्या गोष्टी-तिची बाग, तिची गॅसची शेगडी, तिचा कुत्रा, तिची खुर्ची, तिचा पलंग-सारेच तिची मायेनं चाहूल घेतात अन् असं हलक्या लाटांनी तिच्याकडे येणाऱ्या सुखानं तिला समाधान वाटतं.

इंदिरा संत यांची ही सहज साधी कविता हा भाव आपल्यापर्यंत पोहोचवते. घर - इंदिरा संत उभ्या दिवसभराचे उपसून व्यापताप, येतां घरापाशी लागावी मना धाप. केव्हा येणार मैत्रिण वाट पाहे सोनकेळ, मला बघून हासते तिचे गोजिरेसे बाळ. रानगुलाब झुलतो फुलं टोकाशी धरून, म्हणे, घे ना तुझ्यासाठी एक ठेवले जपून गोंजारावे केळफुलं फुलं ओठाशी लावावे, आणि पायऱ्या चढून दारा कुलूप काढावे. आली धनीणं धनीणं दार नाचले स्वभावे, किती पहाण्याची वाट घर फुलून उठावे येतो आतून धावत माझा गुणी कालिदास, घोटाळत पायापाशी बोले मांजराची भास. म्हणे समोरची खुर्ची बैस इथे क्षण काळ, घेते ठेऊन टेबल माझी धनोली घड्याळ. उभा ताम्रवर्णी हंडा पाणी तुडुंब भरून, म्हणे, घालावी गं, शीण, जळ शीतल शिंपून. बर्शेनचे लाल पीप म्हणे आता चहा करू. पाट होताच आडवा आले पेले तुरूतुरू. बैसविले विमानात चहावरील वाफांनी, माडीवर पोचलें मी जिना चढल्यावाचूनी. पाय टाकताच आंत मार्कोनीची चाले घाई, चुकेल ना अख्तरीच्या केवड्याचा धुंद शाही. नको अशी उभी राहू, नको काढू काही काम, मला आर्जवी पलंग घेई थोडासा आराम.

अत्तराचे कानी सूर डोळ्यावर गोड ग्लानी, सुख घराचे हे येते असे लाटांनी लाटांनी. या घरात ती सगळ्यांसाठी असली, तरीही स्वतः मात्र ती एकाकी आहे. शांताबाईंनी त्यांच्या 'एकाकी' या कवितेतून या भावना व्यक्त केल्या आहेत. सारं काही तुझ्यासाठीच असं म्हणणाऱ्या तिच्या जिवलगाचं दैहिक प्रे तिला जाणवतं आणि तिचं अंतर्मन दुःखानं विचारतं, की हे माझ्या मनाचं एकटेपण कधीतरी संपेल का? एकाकी - शांता शेळके तुझा आणि तुझ्यासाठी शब्द सारे खोटे खरी फक्त क्वचित कधी बिलगणारी बोटे, बिलगणारी बोटे तीही बिलगून सुद्धा दूर, खोल खोल भुयारात कण्हणारे सूर. दूरदूरच्या ओसाडीत भटकणारे पाय, त्वचोगील एकाकीपण कधी सरेल काय? याच भावना व्यक्त करताना कवयित्री पद्मा गोळे म्हणतात- की, एकेका रात्री ती हळूहळू आतून कोसळते आणि पूर्ण उद्‌ध्वस्त होते. त्या मृतप्राय मनाला ती आत दाबून टाकल्यावरही तिला जाणवतं की तिच्या अंतर्मनाला अजून वेदना होतात.

मन जिवंत आहे अन् ती असहाय्य! सकाळी उजाडता उजाडता - पद्मा गोळे सकाळी उजाडता उजाडता उठले, पाहिलं आणि कमालच! एक वीट निखळलेली. मी उचलून लावली ती जिथल्या तिथे. पुन्हा चार दिवसांनी पूर्वा लाल व्हायच्या आधीच उठले, पाहिलं, तर अर्ध्याअधिक विटा उचकटून फेकलेल्या ! पुन्हा माझी कारागिरी! पुन्हा काही दिवसांनी मध्यरात्रीच जाग आली, पाहिलं : थडगं पूर्ण उस्कटलेलं ! आणि उघडलेल्या शवपेटीत मन चक्क डोळे चोळीत उठून बसलेलं! तसं रडतच होतं म्हणा. पण जिवंत? अकल्पनीय! म्हणजे थडगं बांधूनही मन याला निलाजरं म्हणायचं की असहाय्य ! अशा वेळी कवयित्री पद्मा गोळे यांना सीता आठवते. काहीही न बोलता पती राम म्हणेल तसे वागली तरीही रामायण झाले. बोलली असती तर? ते बोलल्यानंतर घडलेलं महाभारत सहन करायला पाठीशी द्रौपदीला मिळाला तसा कृष्णसखा हवा. पाठीशी कृष्ण हवा - पद्मा गोळे मौनानं ही होतं एवढं रामायण हे माहीत असतं तर शब्दांच्याच स्वाधीन झाले असते; पण शब्दांनी नेली असती मिरवणूक भलत्याच दिशेला. शब्द म्हणजे अंध कौरव ओठात एक, पोटात भलतंच मौनाचं रामायण सहन करता येतं सीता होऊन; पण शब्दांचं महाभारत सोसायला पाठीशी कृष्ण हवा. आजच्या खंबीर स्त्रीच्या भावना व्यक्त करताना कवयित्री अरुणा ढेरे म्हणतात, की- मी कोणालाही न दुखवता, माझ्या आत कोवळेपणओलावा जपत आणि माझं दुःख आत लपवून जगणार. मी नखलत नाही शिरा कोवळ्या ओल्या दुडून कडांना दुखवत नाही देठ ... मी फक्त ठेवते उजेड हिरवा आत अन प्रेमासाठी मिटून घेते ओठ ... स्त्रीला पूर्णत्वानं जगायचं आहे. तिच्या मोकळ्या आकाशात मुक्त वावरायचं तिचं स्वप्न आहे. तिचा स्वतःवर विश्वास जागवत तिला समजून घेत तिला तिची लढाई लढण्याची उमेद देणारा एक मित्र हवाय्. माझ्या मित्रा - अरुणा ढेरे ऐक ना, मला दिसते नुसते चमकते अपरंपार आभाळ, अलीकडे दाट काळ्या रात्रीची शांत झुळझुळ बासरीच्या एखाद्या माधवी स्वरासारखा तीव्र मधुर तिथला वाऱ्याचा वावर आणि मुक्त असण्याची त्यात एक मंद पण निश्चित ग्वाही कितीदा पाह्यलेय मी हे स्वप्न, झोपेत आणि जागेपणीही ! आज तुला ते सांगावेसे का वाटले कळत नाही पण थांब, घाई करू नकोस, अर्धे फुललेले बोलणे असे अर्ध्यावर खुडू नाही. हे ऐकताना हसशील, तर मर्द असशील; स्वप्न धरायला धावशील माझ्यासाठी, तर प्रेमिक असशील, समजशील जर शब्दांच्या मधल्या अधांतरात धपापतेय माझे काळीज, तर मग तू कोण असशील ? स्वप्नच होशील तर परमेश्वर असशील, हाती देशील तर पती असशील, आणि चालशील जर माझ्यासोबत त्या उजळ हसऱ्या स्वप्नाकडे समजून हेही, की ते हाती येईल, न येईल, पण अपरिहार्य माझी ओढ, माझे कोसळणे, धापत धावणे आणि माझा विश्वास, की माझे मलाच लढता येईल, तर मग तू कोण असशील ? मित्र असशील माझ्या मित्रा ! मागील शतकातील स्त्री आणि आताची एकवीसाव्या शतकातील स्त्री यात बराच फरक पडला आहे. आजच्या स्त्रीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होत आहे. तिच्या जाणिवेच्या कक्षा रुंदावत असताना तिची स्वतःशीच अंतर्बाह्य ओळख होते आहे. स्वतःचा असा शोध घेताना तिला स्वतःची क्षमता जाणवते आणि तिची ही जाणीव कवयित्री शांताबाई शेळके आपल्यापर्यंत पोहोचवतात त्यांच्या 'शोध' या कवितेतून. शोध - शांता शेळके बाहेरचे प्रदेश संकुचित होत आहेत तसतसा आतल्या अज्ञात प्रदेशांचा शोध लागत आहे मला माझी मीच किती अनोळखी होते स्वतःला माहीत नव्हते मला माझे बळ, माझी दुर्बलता, सतत मला वेढून बसलेली माझी भीरूता माझे माझ्याशी असलेले भांडण, माझ्या निकट सहवासातलेही माझे एकाकीपण, काहीच उमगत नव्हते यांतले होते केवळ असह्य घुसमटणे एका अथांगातले... आता आतल्या आत मी आहे उलगडत, क्षणोक्षणी विस्तार पावत, पोहोचते आहे जाऊन माझ्याच अंतरंगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत, मी चकित होते आहे, स्तिमित होते आहे, दुखावत आहे आणि सुखावतही. वेगवेगळ्या काळातील स्त्रीच्या या व्यक्त-अव्यक्त जाणिवा या कवयित्रींनी आपल्यापर्यंत पोहोचवल्या आहेत. स्वत्वाची जाणीव असलेल्या आजच्या स्त्रीला महिला दिनानिमित्त शुभेच्छा!

**सोलापूरची संघर्षनायिका ज्योतीताईंचा आवाज संसदेत घुमणार ...! प्राध्यापक डॉ. ज्योतीताई वाघमारे... बस नाम ही काफी है.... सोलापूरची कन्या..... संघर्षाचे दुसरे नाव म्हणजे ज्योतीताई..... अभ्यासू नेतृत्व म्हणजे ज्योतीताई.... महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ म्हणजे ज्योतीताई..... सामान्य जनतेला न्याय देणारे नेतृत्व म्हणजे ज्योतीताई अडचणींना धाऊन जाणाऱ्या भगिनी म्हणजे ज्योतीताई.... या महाराष्ट्राची लाडकी बहीण म्हणजे ज्योतीताई. ज्योतीताई भारतीय संसदेतील वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेवर खासदार म्हणून जात आहेत.... उपमुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे साहेब यांनी त्यांची सार्थ निवड केली आहे... अवघ्या महाराष्ट्राला अभिमान वाटावा आणि गर्व वाटावा अशी ही निवड आहे.... सोलापूरची संघर्षशील कन्या ज्योतीताईंचा आवाज संसदेत घुमणार आहे... संघर्षाची ज्योत आता दिल्लीच्या तख्तावर झळकणार आहे....सोलापूरचा अभिमान देशभर दुमदुमणार. ताई तुमचे हार्दिक अभिनंदन....!!!**



# ज्ञानाची 'ज्योत' आता दिल्लीच्या तख्तावर...

पत्र्याची खोली अन् गरिबीतील बालपण... संघर्ष आणि शिक्षणाच्या जोरावर आता राज्यसभेची खासदारकी मिळाली आहे...संघर्षाची ज्योत दिल्लीच्या तख्तावर जात आहे! रस्त्याच्या दिव्याखाली अभ्यास करणारी मुलगी आता संसदेत विचार व्यक्त करणार आहे. सोलापूरच्या मातीतून उभी राहिलेली संघर्षाची ज्योत आता थेट दिल्लीच्या तख्तावर पोहोचत आहे. शिवसेनेच्या राज्य प्रवक्ता प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांना राज्यसभेसाठी उमेदवारी जाहीर होणे ही केवळ वैयक्तिक यशाची कथा नाही, तर संघर्ष, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या शक्तीचा सन्मान आहे.

गरिबीतून, पत्र्याच्या छोट्याशा खोलीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज संसद भवनापर्यंत पोहोचत आहे. वेटर वडिलांच्या कष्टातून उभ्या राहिलेल्या या ताईने शिक्षण, अभ्यास आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सामाजिक कार्य, सामाजिक चळवळ, प्रसार माध्यमातील योगदान, आंबेडकरी विचारांचा वारसा, समाजप्रबोधनाची तळमळ आणि अन्यायाविरुद्ध आक्रमकपणे आवाज उठवण्याची त्यांची शैली यामुळे त्या राज्याच्या राजकारणात प्रभावीपणे पुढे आल्या. महाराष्ट्रभर त्यांची मुलुख मैदानी तोफ धडाडली. शिवसेना प्रमुखांच्या विचार नेतृत्वावर विश्वास ठेवत त्यांनी पक्षाची भूमिका उभ्या महाराष्ट्रात ठामपणे मांडली आणि आज त्याच कर्तृत्वाची दखल घेत त्यांना राज्यसभेसाठी संधी देण्यात आली आहे. सोलापूरसारख्या शहरासाठी ही अभिमानाची बाब आहे की, येथील एका संघर्षशील मुलीला आता देशाच्या सर्वोच्च संसदेत काम करण्याची संधी मिळत आहे. प्रा. ज्योती वाघमारे यांचा हा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे. त्यांच्या या नव्या वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..! दिल्लीच्या संसदेतूनही त्या समाजाच्या प्रश्नांसाठी तितक्याच ताकदीने आवाज उठवतील, असा विश्वास आहे. ताई, आम्हा सर्वांना तुमचा सार्थ अभिमान आहे. आपल्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा....! अभिनंदन....!!! -

# महिलांच्या सशक्तीकरणासाठी सर्वांगीण विकासाची गरज





**डॉ. राधिका चिलका**
संचालिका,
संभाजीराव शिंदे विद्यामंदिर,

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हाच आमच्या संस्थेचा मुख्य हेतू आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. विशेषतः महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आमचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. अध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. महिलांनी स्वतःच्या क्षमतेची जाणीव ठेवून समाजात सक्रिय भूमिका बजावावी, हा आमचा प्रयत्न आहे. विविध उपक्रम, मार्गदर्शन आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांना प्रोत्साहन देण्याचे काम संस्था सातत्याने करत आहे. महिला दिनानिमित्त आपण सर्वांनी महिलांचा सन्मान राखत त्यांना समान संधी देण्याचा संकल्प केला पाहिजे. सशक्त आणि जागरूक महिला घडल्या तरच समाजाचा खरा विकास शक्य आहे.

# सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रेरणादायी नेतृत्व : स्वरूपाराणी मोहिते-पाटील

स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्य करणाऱ्या प्रभावी युवा नेत्या आहेत. एम.ए. (कौन्सेलिंग सायकॉलॉजी) शिक्षण घेतलेल्या स्वरुपाराणी मोहिते-पाटील या माळशिरस तालुक्यातील यशवंतनगर येथील रहिवासी आहेत. वडील जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, आजोबा शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील आणि चुलते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. सन २०१७ मध्ये बोरगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवून त्या ६,५३८ मताधिक्याने विजयी झाल्या. त्याच वर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली. २०१७ ते २०२२ या कालावधीत त्यांनी अधिसभा सदस्या म्हणून काम करताना शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमांना चालना दिली. त्या २०१५ पासून शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूजच्या सदस्या म्हणूनही कार्यरत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर ५८ शाखांमधून सुमारे ३२ हजार विद्यार्थी पूर्वप्राथमिक ते पीएच.डी. पर्यंत शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक संस्थांमध्येही त्या विविध जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. रत्नाई कृषी महाविद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला तसेच महिला वसतिगृह यांसारख्या संस्थांच्या त्या सभापती आहेत. सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड रिसर्च सेंटरच्या विकास समितीच्या त्या अध्यक्षा म्हणूनही कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.



संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ, प्रताप क्रीडा मंडळ आणि सयाजीराजे पार्कच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम राबवले जातात. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना महात्मा फुले पुरस्कार (२०१८) आणि प्राऊड महाराष्ट्रीयन (२०१९) या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षण, समाजसेवा आणि युवकांना प्रेरणा देणाऱ्या त्यांच्या कार्यामुळे त्या आज अनेकांसाठी आदर्श ठरत आहेत.

**संकलन –आरती कुसेकर**
**मांडणी – मयूरा तारे**

# विद्यार्थी दशेपासूनच राजकीय क्षेत्रात करिअर करण्याचा ध्यास



**रोहिणी तडवळकर**
भाजप शहराध्यक्ष

विद्यार्थी दशेत असतानाच अभाविपच्या माध्यमातून काम चालू केले. यामुळे विद्यार्थी दशेतही महाविद्यालयातील सर्व निवडणुकांत सहभाग घ्यायचे. सामाजिक कार्य करणे, जनसामान्यांची सेवा करणे याची आवड विद्यार्थी दशेपासूनच लागल्याने राजकीय क्षेत्रात करिअर करायचा ध्यास घेतला आणि यामुळेच भाजपाच्या सोलापूर शहराध्यक्ष आणि नगरसेविका म्हणून काम पाहते आहे. १९८६ ते २०२० पर्यंत एका शाळेच्या शिक्षिका म्हणून ३४ वर्ष सेवा केली आणि निवृत्त झाले. या काळातही म ा झे काम सांभाळून भारतीय जनता युवा मोर्चाचे काम करत होते.



माजी महापौर तथा भाजपाचे जेष्ठ नेते किशोर देशपांडे यांच्या प्रेरणेतून मी भाजपाचे काम चालू केले आणि १९९२ साली प्रथम नगरसेविका म्हणून निवडून आले. यानंतर ३ टर्म काम केले. या काळात महापालिकेत विरोधी पक्षनेता पदांसह विविध पदांवर काम केले. भाजपा महिला आघाडीच्या शहर अध्यक्षा म्हणूनही काही काळ धुरा सांभाळली. भाजपा सरचिटणीस पदानंतर आता भाजपाची शहराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेविका म्हणून माझ्यावर पक्षश्रेष्ठींनी जबाबदारी दिली आहे. इमाने इतबारे जनहिताची कामे करून राजकीय क्षेत्रात नावलौकिक मिळविण्याचा आपला संकल्प आहे.




# प्रेम, कष्ट व त्यागाचे प्रतीक म्हणजे महिला



**रंजिता चाकोते**
सोलापूर

शक्ती, प्रेम, कष्ट आणि त्यागाचे प्रतीक म्हणजे महिला आहेत त्यांचा योग्य सन्मान, आदर झाला पाहिजे. महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली पाहिजे. महिला या परिश्रम घेऊन आपल्या कुटुंबाची काळजी घेतात. कुटुंबांची जडणघडण करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. मुलांवर संस्कार घडवितात. त्यांचे पालन पोषण आणि शिक्षणाची काळजीही त्या घेतात. महिला दिनाच्या निमित्ताने मला पालिका स्थायी समिती सभापती पद लाभले. ही जबाबदारी मी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडणार आहे. सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास करतानाच महिलांसाठी अंदाजपत्रकात विशेष तरतूद करण्याचा प्रयत्न राहणार आहे. सोलापूर शहरात महिलांसाठी दहा पिंक टॉयलेट, १०० इ बसेस पैकी काही बसेस महिलांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. महिलांच्या विकास आणि सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगत सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या नूतन सभापती रंजिता चाकोते यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रपती, पंतप्रधान पदही तू भूषवले... स्वत:साठी वेगळे अस्तित्व निर्मिले





**आशा पाटील**
आदर्श बाल व प्राथमिक मंदिर
कवठेकर प्रशाला, पंढरपूर

**आपलेच सर्व हेच**
**तत्व अंगिकारले**
**स्वत:सह सर्वांचा**
**विकास तुलाच जमले**
**म्हणूनच तुला**
**निर्मात्यानेही वंदिले**

राष्ट्रपती, पंतप्रधान यांसारखी उच्च पदे भूषवून महिलांनी स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या विकासात स्त्रियांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणूनच स्त्री ही सर्जनाची, संवेदनांची आणि सामर्थ्याची प्रतिमा मानली जाते.

महिला दिनाचे प्रतीक म्हणून जांभळा, हिरवा आणि पांढरा हे रंग वापरले जातात. जांभळा रंग न्याय आणि सन्मानाचे, हिरवा रंग आशेचे तर पांढरा रंग पावित्र्याचे प्रतीक मानला जातो. अनेक देशांमध्ये हा दिवस विशेष पद्धतीने साजरा केला जातो. काही ठिकाणी महिलांना सुट्टी दिली जाते, तर काही ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

आजच्या आधुनिक युगात महिलांनी शिक्षण, विज्ञान, क्रीडा, राजकारण, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवले आहे. तरीही समाजात काही ठिकाणी असमानता आणि भेदभाव दिसून येतो. त्यामुळे महिलांना समान हक्क, आदर आणि संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे सक्षमीकरणाचे प्रमुख साधन आहे. प्रत्येक मुलीला दर्जेदार शिक्षण मिळाल्यास ती आत्मनिर्भर आणि सक्षम बनते. स्वावलंबनाची जाणीव महत्त्वाची आहे. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे, कारण आर्थिक स्वातंत्र्य आत्मविश्वास वाढवते. समान संधी आणि समान हक्क मिळणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष भेदभाव न करता समाजातील प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान संधी दिल्या पाहिजेत.


स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. महिलांनी आपल्या कौशल्यांचा विकास करून नवीन संधींचा स्वीकार केला पाहिजे.

कुटुंब आणि समाजाचा पाठिंबा महत्त्वाचा आहे. महिलांच्या प्रगतीसाठी घरातील आणि समाजातील सकारात्मक वातावरण आवश्यक असते. कायद्यांची जाणीव आणि संरक्षण गरजेचे आहे. महिलांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहून अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगती साधता येते. डिजिटल शिक्षण, व्यवसाय आणि माहितीमुळे महिलांना नवीन संधी उपलब्ध होतात. स्त्री-पुरुष समानतेची भावना जोपासणे आवश्यक आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दोघांनाही समान स्थान आणि आदर मिळणे गरजेचे आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ महिलांची प्रगती नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासाचा मजबूत पाया होय. महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून स्त्रीच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार अंगीकारून प्रत्येकाने महिलांना आदर, सन्मान आणि प्रोत्साहन दिले पाहिजे. समाजाच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुष दोघांनाही समान स्थान मिळणे हीच खरी महिला दिनाची भावना आहे. सर्व महिलांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

# स्त्री

तो पुरुष झाला तीही स्त्री
दबकत, दबकत
लाल फुलांच्या झाडावर
पक्षी बसला हरखत हरखत
जगण्याला मुरड घातली
इच्छांच्या घड्या केल्या
अलबत, अलबत
वर्षांगून वर्ष उलटली
हिशोबाच्या वह्या भरल्या
सरकत सरकत
शब्दांना मौन आले
रुद्रावतार सौम्य झाले
फसगत फसगत
शेवटी फांदी रीती बिचारी
मन एकाकी विदीर्ण
उसवत उसवत

**जयश्री दाणी**



# महिला क्रीडापटूंची ऐतिहासिक कामगिरी : नारीशक्तीचा अभिमान



आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. क्रीडा क्षेत्रात अनेकदा पुरुषांच्या यशाचा गौरव झळकतो; परंतु जेव्हा एखादा महिला संघ जागतिक पातळीवर देशाचा झेंडा उंचावतो, तेव्हा तो केवळ क्रीडाविजय नसतो, तर तो स्त्रीशक्तीचा सन्मान आणि समाजासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरतो. भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकत देशाचा अभिमान उंचावला आणि मेहनत, आत्मविश्वास व संघभावनेच्या जोरावर महिलाही मोठे यश संपादन करू शकतात हे सिद्ध केले.



भारतामध्ये महिला क्रिकेटची सुरुवात १९७० च्या दशकात झाली. त्या काळात मुलींनी क्रिकेट खेळणे अनेकांना आश्चर्य वाटायचे. मात्र मिताली राज, हरमनप्रीत कौर आणि स्मृत मंधाना यांसारख्या खेळाडूंनी आपल्या जिद्दीने समाजाचे विचार बदलले. आज महिलांनी बॅडमिंटन, कुस्ती, बॉक्सिंग आणि अॅथलेटिक्ससारख्या अनेक खेळांमध्ये जागतिक यश मिळवले आहे. पी.व्ही. सिंधू, साक्षी मलिक यांसारख्या खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. आज ज्या हातांनी घराची जबाबदारी सांभाळली, तेच हात ट्रॉफी उचलत आहेत. हीच खरी नारीशक्तीची ओळख आहे. महिला दिनाच्या निमित्ताने या यशस्वी महिलांकडून प्रेरणा घेऊन अधिकाधिक मुलींनी क्रीडा क्षेत्रात पुढे यावे, हीच अपेक्षा.

